CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २३६ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### भरधाव कारने ४ वर्षीय मुलीला चिरडलं

**पुणे :** पुणे–अहिल्यानगर मार्गावर भरधाव कारने ४ वर्षीय मुलीला चिरडलं. मुलगी गंभीर जखमी असून शिरुरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महामार्गावरील सरदवाडीजवळ हा अपघात झालाय. कार आमदार माऊली कटके यांची असल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र याबाबत पोलिसांत तशी कुठलीही तक्रार नाही आहे.

### प्रचाराच्या अंतिम टप्प्यात 'अंधश्रद्धे'चा प्रवेश

**परंडा :** परंडा नगरपरिषद निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात जनशक्ती नगरविकास आघाडीच्या प्रमुख उमेदवारांना लक्ष्य करत धक्कादायक जादूटोणा करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कब्रस्तानात नेत्यांच्या फोटोला सुया टोचून काळ्या कपड्यात बांधलेले आढळले. यामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणुकीच्या प्रचाराला वेगळे वळण लागले आहे. निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत, मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते रात्री उशिरापर्यंत बैठका घेतात, कॉर्नर सभा घेऊन भेटीगाठी करत असताता. मात्र हे सर्व प्रयत्न सुरू असतानाच आता, दुसरीकडे अंधश्रद्धेचा आधार घेतल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे.

### मालेगाव न्यायालयाला पोलीस छावणीचे स्वरूप

**मालेगाव :** माले–गाव तालुक्यातील डोंगराळे चिमुकली अत्याचार आणि खून प्रकरण. आज आरोपी विजय खैरनार याला मालेगाव न्यायालयात करणार हजर. २७ तारखेनंतर आज चार दिवसाची पोलीस कोठडी संपेल. आरोपीच्या मागील सुनावणी वेळचा प्रकार बघता मालेगाव न्यायालयाला पोलीस छावणीचे स्वरूप.

### रुपाली ठोंबरे पाटील यांचा राजीनामा

**पुणे :** पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे या गेल्या काही काळापासून पक्षात नाराज असल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर आता यांनी छउझ शहर कार्याध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. रुपाली पाटील ठोंबरे यांनी दोन दिवसांपूर्वीच राजीनामा दिला असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र त्यांचा राजीनामा पक्षाकडून अद्याप मंजूर करण्यात आलेला नाही.

### लाखोंचा ऐवज चोरीला, सीसीटीव्हीमध्ये चोरी कैद

**पिंपरी चिंचवड :** पिंपरी चिंचवड शहरातील अत्यंत गजबजलेला परिसर असलेल्या काळेवाडी विजयनगर येथे २७ ते २८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री चोरट्यांनी एसएस सिक्युरिटी नावाच्या दुकानात मोठी चोरी झाली. या घटनेचा सीसीटीव्ही आता समोर आला आहे. काळेवाडी येथील शॉप नंबर १, एप्पल प्रकृती बिल्डिंग येथील दुकानाचे कुलूप चोरट्यांनी अत्यंत कौशल्याने तोडले, त्यातील कपाटे फोडून चोरट्यांनी १३ तोळे सोनं आणि रोख रक्कम, असा लाखो रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

# शक्तिपीठ महामार्ग पूर्ण करणारच : फडणवीस





**कोल्हापूर :** जनतेच्या समर्थनामुळे शक्तिपीठ महामार्ग चंदगड तालुक्यातून वळवला असून कोणत्याही परिस्थितीत तो मार्गी लागणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यामध्ये भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेमध्ये बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी शक्तिपीठ महामार्गाला हात घालत शक्तीपीठ महामार्ग पूर्ण करणार असल्याचे सुतोवाच केले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की रस्ते विकासामुळे विकासाची दारे खुली होतात. त्यामुळेच तुमच्या मागणीवरून विकासाचा शक्तिपीठ मार्ग चंदगडमधून वळवला आहे. या ठिकाणी लॉजिस्टिक पार्क, एमआयडीसी देऊन उद्योग उभारणार आहोत. तसेच आमदार शिवाजी पाटील यांच्या संकल्पनेतील पर्यटन हब तयार करण्यासाठी प्रयत्न करू, असेही फडणवीस यांनी यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ होणार असं म्हटल्यानंतर शक्तिपीठ विरोधी संघर्ष समितीकडून याचा निषेध करण्यात आला आहे. शक्तीपीठ महामार्गाचा हट्ट धरला तर शेतकरी पुन्हा तीव्र आंदोलन सुरू करतील, असा इशारा संघर्ष समितीचे राज्य समन्वयक गिरीश फोंडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे. पत्रकात म्हटलं आहे की, १२ जिल्ह्यासह शिरोळ, हातकलंगले, कागल, तालुक्यातील लोकांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध केला आहे. रस्त्यांसाठी जमीन मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना हाकलून लावलं आहे. शेतकरी छातीचा कोट करून विरोध करीत आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत महामार्ग होणार नाही, सरकार केवळ कंत्राटदारांचे भलं करण्यासाठी महामार्ग होणार असल्याचे सांगत आहे, पण महामार्ग कशासाठी हवा याचे उत्तर सरकारने दिलेलं नाही. गेल्या चार महिन्यात एकाही गावात संयुक्त मोजणी होऊ दिलेली नाही, तरी सरकार शक्तिपीठ रेटण्याचा प्रयत्न होत असल्याचे पत्रकात म्हटलं आहे.

# मुख्यमंत्र्यांचा निवडणूक आयोगावर आक्षेप

**मुंबई :** राज्यातील २२ नगरपरिषदांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका पुढे ढकलल्या आहे. गेल्या दोन आठवड्यापासून जिथं प्रचाराचा धुरळा उडत होता. तिथं अचानक निवडणूक लांबल्यामुळे कार्यकर्ते आणि उमेदवारांच्या उत्साहावर पाणी फेरलं गेलंय. जिथं जिथं निवडणूक पुढे ढकलली तिथल्या निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर झालाय. जिथं जिथं निवडणूक पुढे ढकलली तिथं आता २० डिसेंबरला मतदान होईल आणि २१ तारखेलाच मतमोजणी होण–ार आहे. उर्वरित ठिकाणांच्या निवडणुका मात्र ठरल्याप्रमाणे २ डिसेंबरला नियोजित वेळत पार पडणार आहे. दरम्यान, निवडणुकीच्या या निर्णयावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्षेप घेतले



आहेत.

निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ ला–वला आहे. कुठला कायदा निवडणूक आयोग काढतोय. ते मला माहित नाही, माझ्या अभ्यासानुसार निवडणुका पुढे ढकलता येत नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. या ठिकाणी निवडणूक पुढे ढकलणं अत्यंत चुकीचं आहे. उद्या निवडणुका आणि आज निवडणुका पुढे ढकलतात हे खूप चुकीचं आहे. अनेक उमेदावारांची प्रचाराची मेहनत वाया गेली. निवडणूक आयोग स्वायत्त असलं तरीही अशाप्रकारे निर्णय घेणं चुकीचंच आहे. याबद्दल रिप्रेझंटेशन आम्ही निवडणुक आयोगाला देऊ, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

# जतमध्ये निवडणुकीला हिंसक वळण

**सांगली :** नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्रात आज मतदान होणार आहे. मतदानाच्या एक दिवस आधी जत नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराला हिंसक वळण लागलं. इथं राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुरेश शिंदे यांच्या घरावर आणि गाडीवर पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तींकडून दगडफेक करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यामुळे निवडणुकीच्या रणधुमाळीत तणाव वाढला आहे. पहाटेच्या वेळी काही अज्ञात व्यक्तींनी अचानकपणे सुरेश शिंदे यांच्या घरावर दगडफेक करण्यास सुरुवात केली. या हल्ल्यामध्ये सुरेश शिंदे यांच्या घराचं आणि गाडीचं मोठं नुकसान झालं आहे. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## बार्शी–लातूर महामार्गावरील घटना; नवविवाहित दाम्पत्य मात्र सुदैवाने बचावले



# भीषण अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू

**सोलापूर :** राज्यातील अपघातांच्या वाढत्या घटनांमध्ये आणखी एका हृदयद्रावक घटनेची भर पडली आहे. बार्शी–लातूर राष्ट्रीय महामार्गावरील जांभळबेट घारी शिवार पुल–ावर आज, १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी भीषण अपघात झाला. यावेळी मालट्रक आणि कार यांच्यात झालेल्या भीषण अप–घातात कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. हे सर्वजण सोलापूर जिल्ह्या–तील कुर्डुवाडी येथील रहिवासी होते. ते तुळजापूरच्या देवीच्या दर्शनासाठी निघाले होते. या दुर्घटनेत नवविवाहित दाम्पत्य मात्र सुदैवाने बचावले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

कुर्डुवाडी येथील कांबळे आणि वाघमारे कुटुंबातील सदस्य एकाच कारमधून सात प्रवासी तुळजापूरच्या दर्शनासाठी निघाले हो–ते. नवविवाहित अनिकेत गौतम कांबळे (वय २५) आणि त्यांची पत्नी मेघना अनिकेत कांबळे (वय २२) हे त्यांच्या कुटुंबासह प्रवास करत होते. मिळालेल्या माहितीनुसार, बार्शी तालुक्यातील जांभळबेट पुलाजवळ त्यांच्या कारला समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या मालट्रकने जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, कार रस्त्याच्या खाली कोसळली आणि पुलाच्या संरक्षक कठड्याअभावी ती पूर्णपणे चिरडली गेली. या अपघातात कारमधील गौतम भगवान कांबळे (६५), जया गौतम कांबळे (६०), संजय तुकाराम वाघमारे (५०), सारिका संजय वाघमारे (४५) आणि इतर एक महिला (नववधूची मावशी) अशा पाच जणांचा जा–गीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेत अनिकेत आणि मेघना कांबळे हे नवविवाहित दाम्पत्य गंभीर जखमी झाले असले तरी ते बचावले आ–हेत. या अपघातानंतर तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले. या दोन्ही जखमींना तातडीने बार्शी येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. या अपघाताची माहिती मिळताच पांगरी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी पंचनामा केला असून, मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवले आहेत. तसेच, अपघातास कारणीभूत असलेल्या मालट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान एकाच कुटुंबातील पाच सदस्यांचा अपघातात मृत्यू झाल्याने कुर्डुवाडी गावावर शोककळा पसरली आहे.

# विकासासाठी कमळ आवश्यक : आ. केराम

## किनवटमध्ये भाजपाची जाहीर सभा उत्साहात



**त.भा. वृत्तसेवा**

**किनवट, दि. १ डिसेंबर :** नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने भारतीय जनता पक्षातर्फे दुर्गा मैदान, किनवट येथे भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. शहरातील सर्वच प्रभागातून कार्यकर्त्यांची व नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती दिसून आली. या सभेला आमदार भीमराव केराम, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, प्रवीण साले यांच्यासह महायुतीचे उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. किशन मिरासे, बाबुराव केंद्रे व बाळकृष्ण कदम यांनी संयुक्तपणे केले.

> **नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस; दुर्गा मैदानावर भाजपाची महाजाहीर सभा**


**किनवट शहरातही भाजपाचा नगराध्यक्ष हवा : प्रवीण साले**

सभेला संबोधित करताना प्रवीण साले यांनी देश व राज्यातील सरकारने जात–धर्माच्या पलीकडे सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य दिल्याचे सांगितले. महिलांना सत्त–ेत योग्य स्थान देणे, योजनांमध्ये सर्वांसाठी समान संधी उपलब्ध करून देणे या मुद्द्यांवर ते म्हणाले की, देशाचे आणि राज्याचे नेतृत्व हे सर्वसमावेशक, विकासाभिमुख आहे. किनवटच्या विकासासाठी मोदी आणि फडणवीस यांची विकासगंगा आवश्यक आहे. तसेच तालुक्यात आमदार केराम यांचे बळकट नेतृत्व आहे. आता शहरातही या विकासाचा फायदा व्ह–ावा म्हणून किनवट नगरपालिकेत भाजपाचा नगराध्यक्ष हवा. प्रवीण साले यांनी शहरातील आगामी विकास आराखड्याचे महत्त्व सांगत, नागरिकांनी भाजपाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

सभेच्या शेवटी महायुतीच्या उमेदवारांची फिर्याद, पक्षनेत्यांचा परिचय व विजयाच्या घोषणा देत जाहीर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. दुर्गा मैदानावर कार्यकर्त्यांचा उत्साह लक्षणीय होता.

***१८० कोटींच्या कामांची साक्ष–वचनपूर्तीचा प्रवास सुरूच : आ. भीमराव केराम***

*आमदार भीमराव केराम यांनी आपल्या प्रभावी भाषणात मागील काळात झालेल्या विकासकामांचा उल्लेख केला. ते म्हणाले की, २०२४ मध्ये आपण मला आमदार म्हणून दिलेल्या विश्वासाच्या जोरावर आम्ही वचनपूर्तीची वाट पकडली. राज्य शासनाच्या माध्यमातून १८० कोटी रुपयांची विकासकामे किनवट तालुका व शहरात पूर्ण झाली आहेत. आम्ही दिलेली वचने पूर्ण केली आहेत आणि हीच विकासाची गती पुढेही सुरू राहणार आहे. ते पुढे म्हणाले की, पुढील चार वर्षे माझ्या आमदारकीची सेवा तुमच्यासाठी देणे बाकी आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदावर 'कमळ' या चिन्हावर मतदान करावे. तसेच महायुतीच्या घड्याळ व धनुष्यबाण चिन्हांवरील उमेदवारांनाही पाठिंबा द्यावा. शहराच्या विकासासाठी अनेक कुटुंबांचे योगद–ान राहिल्याची आठवण करून देत त्यांनी भविष्यातील विकास आराखड्यासाठी महायुतीला शहराच्या कारभारात संधी देण्याचे आवाहन केले.*



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तीन नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी आज मतदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** लातूर जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर व औसा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मंगळवार, २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या कालावधीत मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायतीच्या सर्व जागांचे मतदान, तसेच उदगीर शहरातील तीन जागांचे मतदान पुढे ढकलण्यात आले असून ते सुधारित कार्यक्रमानुसार होणार आहे.

उदगीर नगरपरिषदेमध्ये २० प्रभागांमध्ये ९१ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी एकूण ११० मतदान पथके आणि १४ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १२१ कंट्रोल युनिट आणि २४२ बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या नगरपरिषदेत ८३ हजार १७९ मतदार आपला हक्क बजाविणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रान-सार प्रभाग क्रमांक ८ अ, प्रभाग क्रमांक १५ ब आणि प्रभाग क्रमांक १६ ब या तीन सदस्यपदाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे ३७ सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी मतदान होणार आहे.



# नांदेड रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत टाकला जातोय घंटागाडीतील कचरा

## ■ नागरिकांच्या आरोग्याकडे मनपा प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष्य?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** लातूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचा कारभार काही केल्या सुधारणारच नाही, असे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. लातूर शहरातून नांदेडला जाणाऱ्या अगदी शहराच्या भर वस्तीतील मुख्य रस्त्यालगत घंटागाडीतून संकलित केलेला कचरा टाकला जात असल्याने या परिसरातील नागरिकांचे धोक्यात आल्याशिवाय राहील तरी कसे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यावरून नागरिकांच्या आरोग्याकडे मनपा प्रशास-नाचे अक्षम्य दुर्लक्ष्य होत असल्याच्या तक्रारीकडेही फारसे गांभीर्याने पहिले जात नसल्याचे निदर्शनास येते.

लातूर शहराचा चौफेर वेगाने विकास होत आहे. शहरातील नांदेड रोड वगळता अन्य मार्गावरील मालमत्तांच्या किमती जणू आता गगनाला भिडल्या आहेत. त्याला अपवाद आहे तो फक्त नांदेड रोड परिसरातील जागा-मालमत्तांचा. शहराच्या सर्वच भागात आजमितीस प्लॉट आणि घरांच्या किंमती वेगाने वाढलेल्या पाहावयास मिळतात. औसा रोड परिसरातील मालमत्तांच्या किंमतीबाबत तर बोलायलाच नको. मराठवाड्यातील अन्य महानगरांच्या तुलनेत लातूर शहरात प्लॉट, फ्लॅट आणि जागांचे दर जास्ती-चे आहेत, हे वास्तव आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये तीन चार बीएचके चे रो हाऊस पन्नास ते साठ लाखांच्या दरम्यान



मिळते असे सांगण्यात येते. तेवढ्याच रो हाऊससाठी लातुरात मात्र किमान एक कोटी वा त्याहूनही अधिकचे पैसे मोजावे लागतात.

आता छत्रपती संभाजीनगर ही मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळ-खले जाणारे शहर आहे. त्याठिकाणी औद्योगिक क्षेत्र, उद्योगधंदेही अधिक आहेत. त्यामानाने लातुरात औद्योगिक क्षेत्र मर्यादित आहे. लातूरला शिक्षणाची पंढरी म्हटले जात असल्याने आणि त्याठिकाणच्या मालमत्ता क्षेत्रातील वाढत्या दलालांमुळे लातूरच्या मालमत्तांचे दर गगनाला भिडले असल्याचे वास्तव आहे.

लातूर शहर व परिसरातील अन्य भागांपेक्षा नांदेड रोडला हे दर बऱ्यापैकी कमी आहेत. त्याचे एकच कारण आहे. हा परिसर वर्षानुवर्षे बकालवस्ती, अविकसित म्हणूनच ओळखला जातो. या भागात मुख्य रस्त्यालगत मोठमोठी धान्याची गोदामेही आहेत. त्यांना लाल गोदाम असे म्हटले जाते. या गोदामांच्या अगदी समोर मुख्य रस्त्यालगत घंटागाडीतून शहराच्या विविध भागातून संकलित करून आण-लेला कचरा बिनधास्तपणे टाकला जा-तो. या वृत्तसोबतच्या छायाचित्रात घंटागाडीतून टाकला जात असलेला कचरा स्पष्टपणे पाहायला मिळतो. या लाल गोदाम परिसरात बाजूला मागास वस्ती आहे. त्या वस्तीतील रहिवासी मुख्य रस्त्यालगतच टायर जाळून त्यातील लोखंडी वायर भंगारात विकण्याचे काम करताना दिसतात.

या टायर जाळण्याच्या प्रक्रियेमुळे या भागातील हवा कायम प्रदूषित असल्याचे पाहायला मिळते. केवळ एवढेच नाही तर या भागातील रहिवाशांसाठी लाल गोदामालगत बांधण्यात आलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांचीही अतिशय दयनिय अवस्था झाल्याचे पाहावयास मिळते. चांगल्या वस्तीतलाच नव्हे तर बकालवस्तीतील व्यक्तीही जाऊ शकणार नाही अशी या स्वच्छतागृहांची अवस्था झालेली आहे. त्याकडेही स्वच्छताविभागाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. बकाल परिसर म्हणून अशा गोष्टींकडे दुर्लक्ष्य करणाऱ्या संबंधितांवर मनपा प्रशासनाने कठोर कार्यवाहीचा बडगा उगारणे आवश्यक आहे. मनपाच्या स्वच्छता विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी रस्त्यालगत कचरा टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या विषयाकडे गांभीर्याने पाहावे व या परिसराची बकाल वस्तीचा भाग अशी असणारी ओळख पुसून काढण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करावी, अशीही मागणी सुजाण लातूरकरांतून केली जात आहे.



# वधू-वर परिचय पुस्तिकेचे शांतवीरलिंग शिवाचार्य महाराजांच्या हस्ते प्रकाशन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** ला-तूर येथे पार पडलेल्या १३ व्या राज्यस्तरीय सकल जंगम समाज वधू वर परिचय मेळाव्याच्या वधू वर नोंदणी परिचय पुस्तिकेचे प्रकाशन रविवारी हिरेमठ संस्थान औसा चे पिठाधिकारी शांतवीरलिंग शिवाचार्य महाराजांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मेळाव्याचे अध्यक्ष शिवशंकर प्रभुलिंग स्वामी, उपाध्यक्ष बसवेश्वर स्वामी कोकलगे घरणीकर, सचिव त्र्यंबक गुरूनाथ स्वामी सह सचिव अनिल गंगाधर स्वामी हरंगुळकर, कोषाध्यक्ष ब्रम्हानंद स्वामी साकोळकर, लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा. सुदर्शन बिराजदार, स्वागताध्यक्ष सोमनाथ स्वामी डिगोळकर, व्यासपीठ प्रमुख शरणप्पा महादयप्पा दावणगिरे, निळकंठ स्वामी हरंगुळकर, बसलींग सिद्धेश्र्वर स्वामी, चंद्रकांत चनबस स्वामी, चंद्रकांत स्वामी पानचिंचोलीकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## वैष्णवी स्वामीला राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** लातूरची रहिवासी कु.वैष्णवी स्वामी हिला भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

नवी दिल्ली येथे सोमवारी (दि. १) झालेल्या फुटवेअर डिझाईन अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट च्या पदवीदान समारंभात राष्ट्रपतींनी वैष्णवीला सुवर्णपदक प्रदान केले. या समारंभास केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री पियुष गोयल, राज्यमंत्री जितीन प्रसाद हेही उपस्थित होते. लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार स्वामी यांची वैष्णवी ही कन्या आहे. एफडीडीआय द्वारा संचलित देशातील एकूण १२ कॅम्पस मधून अव्वल क्रमांक पटकावत कु. वैष्णवी स्वामी सुवर्णपदकाची मानकरी ठरली. केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालया



अंतर्गत शैक्षणिक केंद्र असलेल्या एफडीडीआय कॅम्पसमध्ये पादत्राणे डिझाईन, फॅशन डिझाईन आणि रिटेल मध्ये विविध कार्यक्रम राबवले जातात. त्यात वैष्णवी चा सहभाग आहे.

# १८ हजार विद्यार्थ्यांचे सामूहिक गीता पठण



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** गीता जयंतीच्या निमित्ताने भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या लातूर, उदगीर, अंबाजोगाई, माजल-गाव, बीड व पैठण येथील शैक्षणिक संकुलातील सुमारे १८ हजार विद्यार्थ्यांनी मार्गशीर्ष शुद्ध एकादशी म्हणजेच गीता जयंतीच्या दिवशी गीतेच्या १२ व्या व १५ व्या अध्यायाचे पठण केले. या सहाही संकुलातील विद्यार्थी थेट प्रक्षेपणाद्वा-रे आभासी पद्धतीने जोडले गेले व सकाळी आठ वाजता एकत्रितपणे गीतेच्या १२ व्या व १५ व्या अध्यायाचे पठण केले गेले.

यावेळी लातूर येथील श्री केशवराज शैक्षणिक संकुलातील रेनीसन्स सीबीएसई स्कूलमध्ये गीता जयंतीचा कार्यक्रम उत्सा-हात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास आभासी पद्धतीने विशेष उपस्थित असलेले गीता धर्ममंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंदजी दातार तसेच मंचावर उपस्थित शारदा पीठाधीशांच्या हस्ते सन्मानपत्र व रोख रक्कम २१००० या स्वरूपाचे पारितोषिक प्राप्त तथा गीतेचे १८ अध्याय मुखोद्गत असलेल्या विशेष अतिथी सौ. कांचन भावठाणकर व सौ. सु-वर्णा देशमुख, गीता पठण संस्था समन्वयक प्रवीण सरदेशमुख, सहसमन्वयक संजय गुरव, महेश कस्तुरे, धनंजय तुंगीकर, शैलेश कुलकर्णी, गंगाधर खेडकर, रमनोज शिरूरे, बालासाहेब केंद्रे, शिवाजीराव हेंडगे, रेनीसन्स सीबीएसई स्कूलचे प्राचार्य महेश बांगर यांची मंचावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुव-ात मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्ण, श्रीमद्भगवद्गीता व भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रवीण सरदेशमुख यांनी आपल्या जीवनातील गी-तेचे महत्व सांगितले. गीतेमध्ये रथी व महारथीमध्ये दीर्घकालीन संवाद झाला. यात अर्जुनाची २७ नावे आलेली आहेत तर २३ वेळेस श्रीकृष्णांनी अर्जुनाला युद्धात तयार राहण्यासाठी आव-हन केले आहे. गीतेत अर्जुनाला संबोधल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी दीर्घकाळ कष्ट करावेत, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील विकल्प कमी करावे म्हणजेच संकल्प पूर्ण करता येईल असे सांगितले. याप्रसंगी त्यांनी थोर शास्त्रज्ञ, माजी राष्ट्रपती एप-ीजे अब्दुल कलाम व स्वामी शिवानंद यांची कथा सांगून भगवद्गीतेचे आपल्या जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.

सूत्रसंचालन स्मिता मेहकरकर व वैशाली फुलसे यांनी केले तर आभार केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे यांनी मानले. या कार्यक्रमाची सांगता संतोष बीडकर यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने झाली.

# चोरांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेकडून पर्दाफाश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** लातूर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने जिल्हाभरात मागच्या तीन महिन्यांपासून ज्वेलर्स दुकाने, बँक तसेच अनेक घरफोड्या करणाऱ्या सराईत आरोपींच्या टोळीचा पर्दाफाश केला असून या टोळीकडून १३ किलो ७०० ग्राम चांदीसह सोन्याचे दागिने असा एकूण तब्बल २४ लाख १७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीतील एका आरोपी पोलिसांच्या जाळ्यात सापडला असून टोळीतील आणखी चार आरोपी फरार आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो-लीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी आपल्या पथकाकडून खात्रीशीर माहिती मिळवून लातूरच्या नवीन रेणापुर नाका परिसरात सापळा लावून रविवारी दुपारी दोनच्या सुमारास संशयास्पदरीत्या रोडवर उभा असलेल्या रोशनसिंग बबलुसिंग टाक (वय २० वर्षे), रा. संजयनगर, देऊळगावराजा, जि. बुलढाणा यास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यातील पोत्यामध्ये मोठ्या प्रमाणात चांदीचे दागिने, चैन, करदोरे तसेच सोन्याचे दागिने आढळून आले. चौकशीदरम्यान रोशनसिंग टाक याने त्याच्यासोबतच्या आणखी चार फरार साथीदारांसह अहमदपूर सराफ लाईनमधील अमित ज्वेलर्स व विठ्ठल

### २४ लाख १७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

ज्वेलर्स,) काजळी हिप्परगा येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत, अहमदपूर मधील एका घरात तसेच निलंगा तालुक्यातील मदनसुरी येथील विश्र्वकर्मा ज्वेलर्स व परशुराम पार्क, लातूर येथील एका घरात असे एकूण पाच ठिकाणी चोऱ्या केल्याचे कबूल केले आहे. आरोपी रोशनसिंग बबलुसिंग टाक यास जप्त केलेल्या मुद्देमालासह पोलीस ठाणे अहमदपूर येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात पुढील तपास




कामी ताब्यात देण्यात आले आहे. इतर आरोपींचा शोध सुरू असून लवकरच त्यांनाही अटक करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद, भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोउपनि राजाभाऊ घाडगे, प्रमोद देशमुख पोलीस अमलदार माधव बिलापटटे, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, मोहन सुरवसे, राजेश कंचे, युवराज गिरी, गणेश साठे, शैलेश सुडे, श्रीनिवास जांभळे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, प्रज्वल कलमे, महिला पोलीस अंमलदार अंजली गायकवाड यांनी पार पाडली.

# लातूरमध्ये एड्स दिनानिमित्त सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्यावतीने ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून निघालेल्या या सायकल रॅलीला आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड व सहाय्यक संचालक संजय ढगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप एम. ढेले, जिल्हा परिषदेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अश-




ोक सारडा, वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद कलमे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी बिपीनचंद्र बोर्डे, विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक पवन वाडकर तसेच आर-ोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य 'अडथळ्यांवर मात करुन, एकजूटीने एचआयव्ही, एड्सला लढा देवू, नवं परिवर्तन घडू' चा नारा देवून जनजागरण सायकल रॅलीला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज शहीद भगतसिंग चौक येथून पुन्हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर सायकल रॅलीचा समारोप करण्यात आला. सायकल क्लबमधील अध्यक्ष, सचिव, सदस्य, विद्यार्थी, विविध संस्थातील अधिकारी, कर्मचारी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

आरोग्य उपसंचालक श्रीमती डॉ. गायकवाड यांनी रॅलीतील उपस्थितांना एचआयव्ही, एड्सचा प्रतिबंध व प्रतिकार करणे तसेच एचआयव्ही, एड्सचे समूळ उच्चाटनासाठी प्रयत्न करण्याचे आव-ाहन केले. सहाय्यक संचालक ढगे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप एम. ढेले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विलास दुरुगकर यांनी केले.

रॅलीच्या समारोपप्रसंगी एचआयव्ही, एड्स विषयी रेड रिबन क्लब, दयानंद कला महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांच्या सहभागाने फ्लॅश मॉब उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या सायकल रॅलीमध्ये लातूर येथील सायकलिस्ट क्लब, सायकल बडीज क्लब, मॉम्स विथ क्लब, कल्याणी महिला तांत्रिक व व्यवसायिक प्रशिक्षण मंडळ, टीआय प्रकल्प व प्राईड इंडिया विहान संस्था, तसेच विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

# मतदान अधिकारावर गदा आणणारी लोकशाहीविरोधी कृती : आ. देशमुख

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ डिसेंबर :** लातूर जिल्ह्या-तील निलंगा नगरपरिषद निवडणुकीला मतदानाला अवघे १२ ते १४ तास शिल्लक असताना स्थगिती देण्याचा निर्णय अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. निवडणूक आयोगाची ही कृती जनतेच्या मतदान अधिकारावर गदा आणणारी आणि लोकशाहीविरोधी आहे, अशी तीव्र शब्दात टीका माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी केली आहे.

आ. अमित देशमुख यांनी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवण्याच्या प्रवृत्तीवर कडक शब्दांत ताशेरे ओढले ते म्हणाले, निवडणुका लांबवण्याचे षडयंत्र असूनराज्यातील सत्ताधारी मंडळींना प्रशासनाच्या माध्यमातून एकाधिकारशाही गाजव-ता यावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका या ना त्या कारणाने लांबवण्याचा प्रयत्न होत आहे. ही कृती म्हण्रजे पंचायतराज कायद्याचे उल्लंघन असून पंचायतराज कायद्यानुसार दर पाच वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे आवश्यक आहे, मात्र तांत्रिक कारणावरून या निवडणुका पुढे जातील याची व्यवस्था राज्यातील सत्ताधारी मंडळींकडूनच केली जात आहे असे त्यांनी म्हटले आहे. अंतिम क्षणी निवडणूकांना स्थगिती देणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदे-शानुसार निवडणुका जाहीर झाल्यावरही त्या सुरळीत पार पडणार नाहीत याची सत्ताधारी मंडळीकडून व्यवस्थाच आयोगामार्फतच केली जात आहे, असे दिसुन येते.



लातूर जिल्ह्यातील रेणा-पूर नगरपंचायतसह राज्यातील २२ नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणुका प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना शेवटच्या दिवशी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला, यात निलंगा नगरपरिषद निवडणुकीची स्थगिती सर्वात भयानक आहे असे आमदार देशमुख म्हणाले.

जेथे सत्ताधारी मंडळींच्या विरोधात जनतेचा कौल दिसतो आहे, तेथील निवडणुका स्थगित करण्याचा सपाटा निवडणूक आयोगाने लावल्याचे दिसून येत आहे. निवडणूक प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात निवडणुका स्थगित करून आयोगाने आपण स्वायत्त नसून सत्ताधारी मंडळीच्या हातचे बाहुले असल्याचे सिद्ध केले आहे. सत्ताधारी मंडळीकडून दडपशाही

सत्ताधारी मंडळींनी साम, दाम, दंड या आयुधांचा सर्रास वापर केल्याचे सध्या राज्यभरातील वातावरणावरून दिसून येत आहे. ज्या ठिकाणी काहीही करून निवडणूक जिंकताच येत नाही असे लक्षात आले, तेथील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत, असे त्यांनी नमूद केले.

## थोडक्यात...



### रामजीनगर शाळेमध्ये आरोग्य जागरूकता शिबिर

सोयगाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर(काळे नगर) या शाळेमध्ये दशसूत्री कार्यक्रमांतर्गत आरोग्य जागरूकता शिबिर आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी डॉ.दिपाली साळुंके व आरोग्य सेवक संतोष सोहनी यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक जागृती विषयी सखोल असे मार्गदर्शन केले.यावेळी डॉ.दिपाली साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छ हात कसे धुवावे,दररोज दात स्वच्छ ब्रशने धुवावे, याविषयी प्रात्यक्षिक करून दाखवले या कार्यक्रमाला सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी,राहुल सोनार यांची प्रमुख उपस्थिती लाभलेले होती.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले,सहशिक्षक गोपाल चौधरी, तसेच शालेय शिक्षण समितीचे सदस्य वैशाली पवार,मनीषा जेठे हे उपस्थित होते.

### कामगार-कर्मचाऱ्यांना मतदानासाठी पगारी सुट्टी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार नगर परिषद नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निवडणूकीचा कार्यक्रम घोषित असून जिल्ह्यातील नगरपरिषदांमध्ये निवडणूका होत आहेत. मंगळवार दि.२ रोजी होणाऱ्या नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता मतदार संघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत शासन आदेश निर्गमित झाला आहे.

### 'मिस यू मिस्टर' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**छत्रपती संभाजीनगर :** मंत्रा व्हिजनच्या सहकार्याने थर्ड आय क्रिएटिव्ह फिल्म्स प्रस्तुत 'मिस यू मिस्टर' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून नुकतेच जारी झालेले पोस्टर प्रेक्षकांची उत्सुकता वाढवत आहे. दोन देशांत राहणाऱ्या प्रेमिकांच्या लाँग-डिस्टन्स नात्यावर आधारित ही कथा सिद्धार्थ चांदेकर आणि मृण्मयी देशपांडे यांच्या भूमिकांतून उलगडते. दिग्दर्शक समीर हेमंत जोशी यांच्या मते, हा चित्रपट अंतराने नात्यांवर होणाऱ्या परिणामांचा संवेदनशील वेध घेतो. राजन भिसे, सविता प्रभुणे, अविनाश नारकर, राधिका विद्यासागर आणि दीप्ती लेले यांच्या प्रमुख भूमिका कथानकाला मजबूत आधार देणार आहेत.

### खेळाडूंसाठी टेनिस प्रशिक्षणाचे लोकशाहीकरण

**छत्रपती संभाजीनगर :** नाविन्यतेला क्रीडा व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक बदल या श्रेणीअंतर्गत सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो अनुदान मिळाले. हा प्लॅटफॉर्म सॅमसंगच्या प्रमुख शैक्षणिक उपक्रमाचा भाग आहे, जो वास्तविक विश्वातील आव्हानांसाठी तरूणांनी डिझाइन केलेल्या तंत्रज्ञान सोल्यूशन्सना पाठिंबा देतो. यंदा, चार विजेत्या टीम्सना त्यांच्या संकल्पनांना अधिक निपुण करण्यासाठी आयआयटी दिल्ली येथे १ कोटी रूपयांचा इन्क्यूबेशन सपोर्ट मिळाला. शेळके म्हणाला की टेनिस प्रशिक्षण फक्त काही शहरी भागांमध्ये दिले जाते या वास्तविकतेमधून ही संकल्पना उदयास आली. टेनिस प्रशिक्षण अनेकदा लक्झरीसारखे वाटते, असे तो म्हणाला. औरंगाबाद सारख्या शहरामध्ये उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि तज्ञ प्रशिक्षण अत्यंत मर्यादित आहे.

### गोदरेज कॅपिटलच्या आरोहीने १,000 कोटी चा टप्पा पार केला

**औरंगाबाद :** गोदरेज कॅपिटलचा महिला-केंद्रित उपक्रम, आरोहीने ऑक्टोबर २०२५ पर्यंत एकूण कर्ज बुकिंगमध्ये १,११६ कोटी रुपयांचा आकडा ओलांडल्याचे कंपनीने जाहीर केले आहे. गोदरेज कॅपिटल ही गोदरेज इंडस्ट्रीजची उपकंपनी आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये लाँच झाल्यापासून, आरोहीने ५५२ कोटी रुपयांचा मालमत्ता आधार तयार केला आहे आणि पहिल्याच वर्षात १,६०० हून अधिक ग्राहक जोडले आहेत. यात औरंगाबादचे योगदान प्रमुख आहे. ग्राहक संख्येनुसार या उपक्रमाने आधीच १०% प्रवेशाचे आर्थिक वर्ष २०२६ चे लक्ष्य पूर्ण केले आहे. हे सुरुवातीच्या टप्प्यात मजबूत वाढ दर्शवते.

### गीता धर्माच्या मार्गावर चालण्यासाठी मार्गदर्शन करणारा दिव्यग्रंथ : राज्यपाल आचार्य देवव्रत

**पुणे :** वेदश्री तपोवन, महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान, व इत्यादी संस्थांच्या सहयोगाने वेदश्री तपोवन, आळंदी येथे आयोजित गीता जयंती महोत्सवाचा तीन दिवसाचा कार्यक्रम माननीय राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या उपस्थितित संपन्न झाला. या प्रसंगी पुण्याचे प्रसिद्ध उद्योगपती,महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानचे ट्रस्टी व महोत्सवाचे प्रायोजक श्री अभय भुतडा, श्री राम जन्मभूमी न्यास, अयोध्या येथील कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज, गीता धर्म मंडळाचे अध्यक्ष मुकुंद दातार व संजय मालपाणी हे व्यासपीठावर उपस्थित होते. अंतिम दिनी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी ह.भ.प. शांतीब्रह्म श्री मारुती बाबा कुरहेकर यांना संत श्री ज्ञानेश्वर पुरस्कार व सी.एस. रंगराजन यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार प्रदान केला.

# एमजीएम विद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र!

## 'एआययु'च्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी ४ संघांची निवड; ३ राज्यांतील २३ विद्यापीठांमध्ये उल्लेखनीय कामगिरी

**छत्रपती संभाजीनगर, दि. १ डिसेंबर :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आयोजित ३९ वा सेंट्रल झोन युवा महोत्सव दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान एमजीएम विद्यापीठात उत्साहात पार पडला. मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्र या ३ राज्यांमधील २३ विद्यापीठांच्या ११०८ विद्यार्थ्यांनी विविध कलात्मक, सांस्कृतिक आणि बौद्धिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. या महोत्सवाचे यशस्वी आयोजन एमजीएम विद्यापीठाने केले असून स्पर्धेच्या उत्कृष्ट व्यवस्थापनाबद्दल सर्वांनी कौतुक व्यक्त केले.

या स्पर्धेत एमजीएम विद्यापीठाने पहिल्याच सहभागात चमकदार कामगिरी करत एक वेगळा ठसा उमटवला आहे. विविध २७ स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेल्या एमजीएमच्या विद्यार्थ्यांनी दमदार प्रदर्शन करत ८ स्पर्धांमध्ये पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवले. त्यापैकी ४ स्पर्धांमध्ये पहिल्या तीनमध्ये येत एमजीएमचे ४ संघ २०२६ मध्ये चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. तसेच एमजीएमच्या एका संघाला अभिनयासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे.

क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल सोलो, वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटल सोलो, जनरल क्विझ आणि क्ले मॉडेलिंग या चार स्पर्धांमध्ये पहिल्या तीन तीन मध्ये स्थान मिळवत एमजीएमचे संघ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत.

पहिल्याच प्रयत्नात राष्ट्रीय पातळीवर पात्र ठरण्याच्या या ऐतिहासिक यशाबद्दल एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर तसेच युवा महोत्सवाचे सचिव डॉ.शिव कदम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय स्पर्धांसाठी सर्व संघांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

एमजीएम विद्यापीठाच्या सांस्कृतिक टीममध्ये कार्य करणाऱ्या डॉ.के.पी.सिंग, डॉ.राजू सोनवणे, डॉ.भक्ती बनवस्कर, डॉ. रिहाना सय्यद, प्रा.राहुल खरे, डॉ. राजेश शाह, सुमित चंद्रशेखर, मोहित चंद्रशेखर, प्रा.सतीश जोगदंड, गौरव ढोले आणि गजानन धुमाळ यांनी आपले मोलाचे योगदान दिले.

विजेत्या स्पर्धकांची नावे : १. वेस्टर्न इन्स्ट्रुमेंटल सोलो (पियानो) – नूपुर नागर



(द्वितीय क्रमांक), २. क्ले मॉडेलिंग – गोल्ला नंदवर्धन (द्वितीय क्रमांक), ३.क्लासिकल इन्स्ट्रुमेंटल सोलो (ताल-वाद्य) : प्रसाद तरवडे (तृतीय क्रमांक), ४. जनरल क्विझ – सय्यद उमेर, असजद पठाण, अभिजीत मस्के (तृतीय क्रमांक).

## नवोदित कलाकारांनी पदार्पण करत मालिकांना घेऊन गेले नव्या उंचीवर

**छत्रपती संभाजीनगर, दि. १ डिसेंबर :** एण्डटीव्हीसाठी नव्या प्रतिभांचा वर्ष ठरत आहे. लोकप्रिय मालिकांमध्ये तीन नवोदित कलाकारांनी पदार्पण करत मालिकांना नव्या उंचीवर नेले आहे. 'घरवाली पेडवाली'मध्ये सीरत कपूर सावीच्या आधुनिक, स्पष्टवक्त्या आणि सुपर-जेन झेड भूमिकेत झळकत आहे. ती सांगते, की इतकी उत्साही व बहुरंगी भूमिका साकारण्याची संधी मिळणे तिच्यासाठी आनंददायी आहे.

'हप्पू की उलटन पलटन'मध्ये संजय चौधरी सोनूच्या मोहक, प्रेमळ आणि विनोदी भूमिकेत नवीन रंग भरत आहेत.

त्याचबरोबर 'भाबीजी घर पर है'मध्ये विपिन हिरो मल्खानच्या लोकप्रिय भूमिकेत नवी उर्जा आणत आहेत. ही भूमिका साकारताना स्वतःची शैली जोडण्याचा त्यांचा प्रयत्न असेल, असे ते म्हणतात. तुमच्या आवडत्या मालिका पाहा सोमवार ते शुक्रवार-'हप्पू' रात्री १० वाजता, 'भाबीजी' १०.३० वाजता आणि 'घरवाली पेडवाली' लवकरच, फक्त एण्डटीव्हीवर!

# हतनूर परिसरात दारूची तस्करी उधळली

त.भा. वृत्तसेवा

**कन्नड, दि. १ डिसेंबर :** कन्नड ग्रामीण पोलिसांनी हतनूर परिसरात सापळा रचून देशी दारूची मोठी तस्करी उधळून लावत तिघांना अटक केली. या कारवाईत तब्बल ५.२३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मद्याकर्म अधिनियम कलम ६५ ई अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पोलीस हेडकॉन्स्टेबल कैलास करवंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटना २९ नोव्हेंबर रोजी रात्री ९.२० च्या सुमारास हतनूर कमानीजवळ घडली. संशयित वाहन दिसताच पोलिसांनी घेराबंदी केली आणि तपासणी केली असता गाडीत मोठ्या प्रमाणात देशी दारू भिंगरी संत्राचा साठा आढळला.

१) मनोज चंपकलाल जैस्वाल (वय ५०) २) सुनिल अण्णा देहाडे (वय २४) दिलीप



चंपकलाल जैस्वाल (देशी दारू दुकानदार) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईमध्ये एमएच-२० ईएल ३८९१ क्रमांकाची अशोक लीलँड गाडी १८० एमएलचे ९६ बाटल्या, ९० एमएलच्या ३८४ बाटल्या असा एकूण ५,२३,०४० पाच लाख तेवीस हजार चाळीस रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.

### तीन जणांवर गुन्हा; ग्रामीण पोलिसांची धडाकेबाज कारवाई..!

सदर कारवाई सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार कैलास करवंदे, शिवदास बोराडे, अजय मोतिंगे व मनोज घटुरसिंग यांनी केली. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल एस.बी. बोराडे हे करीत आहेत.

# वेरूळ बाजींच्या पुण्यस्मरणाला लाखो भाविकांची अलोट गर्दी

त.भा. वृत्तसेवा

**खुलताबाद, दि. १ डिसेंबर :** संतोष करपे श्री क्षेत्र वेरूळ निष्काम कर्मयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या ३६ व्या पुण्यस्मरण निमित्त श्रीक्षेत्र वेरूळ येथे जगद्गुरु जनशांती धर्म सोहळा मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. गेल्या सात दिवसात देशभरातील भाविकांसह थोर संत महंत, मंत्री व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी येथे उपस्थिती लावली. आज या भव्य सोहळ्याची सांगता होत असून श्री बाबाजींच्या कर्मभूमीमध्ये भाविकांची व मान्यवरांची मांदियाळी पाहायला मिळाली.

श्री संत जनार्दन स्वामींचे उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली २५ नोव्हेंबरपासून हा सोहळा सुरू आहे.

या कार्यक्रमाची सांगता होणार असून अनुसयांना त्यांच्या मोहन रथाची देखील सांगता होणार आहे. यासाठी संत महंत देखील उपस्थित आहेत.

सोमवार(ता.१) रोजी माजी विधान

### आज सोहळ्याची भव्य सांगता: ७५१ साखर पोत्यांचा महाप्रसाद

परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, फुलंब्री चे आमदार अनुराधा चव्हाण यांनी कार्यक्रमाला भेट देऊन शांतिगिरी महाराजांचे आशीर्वाद घेतले. तर सकाळच्या सत्रात जम्मू काश्मीर येथील अनंत श्री विभूषित अटल आखाडा पिठाधीश्वर राजगुरू आचार्य महामंडलेश्वर श्री श्री १००८ स्वामी विश्वात्मानंद सरस्वती यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

आज कार्यक्रमाची सांगता होणार असून बाबांचा आशीर्वाद प्राप्त करून घेण्यासाठी व या भव्य कार्यक्रमाचे सा-



क्षीदार होण्यासाठी होण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले आहे.

वाराणशी येथील अखिल भारतीय संत समितीचे महासचिव श्री.स्वामी जितेंद्रानंदजी सरस्वती महाराज, सदगुरू योगिराज गंगागिरी महाराज संस्थान, सराला बेटचे श्री महंत स्वामी रामगिरीजी महाराज, भारतानंदजी सरस्वती महाराज, स्वामी योगीराज दयानंद महाराज, (सेलगांव, सिल्लोड), महामंडलेश्वर डॉ. संतोषानंद देवजी महाराज (हरिद्वार), स्वामी देवानंदगिरीजी महाराज, स्वामी सुरेशानंदगिरी महाराज (ऋषिकेश), साध्वी आक्का महाराज, शांतीब्रम्ह एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज ह.भ.प योगीराज महाराज गोसावी (पैठण), स्वामी शंकरानंद सरस्वती (त्रंबकेश्वर) भाजपा महाराष्ट्र प्रदेश आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष तुषार भोसले, ह.भ.प श्री जनार्दन महाराज मेटे, महामंडलेश्व्रवर डॉ. श्री.रामकृष्णदास लहवितकर महाराज, बाबाजींच्या परंपरेतील संत श्री श्री १००८ परमानंदगिरीजी महाराज (भांगसी माता गड), संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त महंत योगी निरंजननाथजी, रामकृष्ण मिशन (सकवार, मुंबई)चे स्वामी तत्वस्वरूपानंदजी महाराज, श्री संत सदगुरू बागडे बाबा संस्थान (मारोळी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) येथील प्रमुख संत श्री. संदेशजी महाराज यांची विशेष उपस्थिती होती.



# श्री खंडोबाच्या दर्शनासाठी 'हाऊसफुल्ल संडे'!

**छत्रपती संभाजीनगर, दि. १ डिसेंबर :** साताऱ्यातील चंपाषष्ठीनिमित्त मल्हार मार्तंड (श्रीखंडोबा) मंदिरामध्ये रविवारी ३० रोजी दर्शनासाठी भक्त-भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. बुधवारी, २६ नोव्हेंबर रोजी चंपाषष्ठीला सुरुवात झाली. प्रतीजेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सातारा यात्रेला मराठवाड्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून भाविक दर्शनासाठी लोटतात. गेल्या पाच दिवसांत हजारो भक्तांनी साताऱ्यात हजेरी लावून खंडोबाचे मनोभावे दर्शन घेतले.

मंदिर परिसरातील दर्शन रांगेतमध्ये सहकुटुंब सहपरिवार चार-चार तास उभे राहून भाविकांनी गाभाऱ्यात प्रवेश करून दर्शनाचा घेवून, बेलभंडारा उधळला. भंडाऱ्यासह रेवड्यांची मुक्तपणे उधळण केली. रात्र-रात्रभर वाघ्या-मुरळी मंडळांनी खंडोबाचे जागरण सादर करून भक्तांची मनसोक्त करमणूक केली.

रविवारी सुटी असल्यामुळे साताऱ्यात भक्तांची गर्दी उसळली होती. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून भाविक आले होते. यात्रा चांगलीच गजबजली असून, विविध साहित्यांसह जीवनावश्यक वस्तू आणि खाऊ-खेळण्यांच्या दुकानांनी सातारा यात्रा फुलून गेली आहे. मंदिर विश्वस्तांनी वाहनतळाची व्यवस्था अतिशय उत्तम केली आहे. जिल्ह्यासह शहरातून आलेले शासकीय व निमशासकीय कर्मचारी कुटुंबांची वाहने एमआयटी मागील परिसरात पार्क करण्यात आली होती. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांचे दर्शन व्हावे, यासाठी ट्रस्टच्या वतीने प्रयत्न करण्यात येत होते. सायंकाळी उशिरापर्यंत मंदिरापासून ते नदीच्या कोपऱ्यापर्यंत दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. कोणीही गडबड गोंधळ न करता रविवार सुटी असल्यामुळे सहकुटुंब सहपरिवार रांगेमध्ये श्रीखंडोबाचरणी माथा टेकविण्यासाठी कोणीही गडबड गोंधळ करताना दिसून आले नाही. अतिशय शिस्तबद्धपणे 'येळकोट येळकोट जय मल्हार' च्या जयघोषात भाविक दर्शनाचा लाभ घेत होते.

# अजिंठा लेणी येथे पर्यटकांची हेळसांड

त.भा. वृत्तसेवा

**फर्दापूर, दि. १ डिसेंबर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी त रविवारी सुट्टी असल्याने आज हाजोरो देशी व विदेशी पर्यटकांनी भेट



दिली. तर आज रविवारी सोयगांव आगारातील सहाच बसेस चालविण्यात येत असल्याने देशी व विदेशी पर्यटकांना बस ची वाट पाहावी लागत असल्याने पर्यटक उभे राहून वैतागून जात होते .त्यामुळे येथील दुकानात काही वस्तु घेण्यास पर्यटक थांबत नाहीत. यावेळी सोयगाव आगारातील जास्तीत बसेस चालविण्यात याव्यात जेणेकरून येथे येणाऱ्या पर्यटकाना लेणीत जाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागणार नाही अशा सूचना सोयगाव आगराला येथील पत्रकार नेहमीच सोयगावं आगरास करत असतात.

परंतू येथील आगार प्रमुख व येथील कंट्रोलर याकडे कानाो डोळा करत असतात.

यावेळी अजिंठा लेणीला भेट देण्यासाठी पर्यटकाना रांगेत एक ते दिड तास रांगेत उभे राहावे लागत होते. तर लेणीत जाण्यासाठी प्रत्येक पर्यटकाला पाच वर्षांपुढील पर्यटकास पंचवीस रुपये प्रमाणे एका कडून तिकिट घ्यावे लागते. यामुळे येथे सर्वात जास्त प्रमाणात उत्पन्न या सोयगाव आगारस मिळते. तर येथे दिवसभरात फक्त एकच साधी बस धावत होती या साध्या बसेस चे तिकिट पंधरा रूपये या प्रमाणे आहे. तर पाच शिवशाही बस धावत होत्या.

कारण की या शिवशाही बस चे तिकीट पंचविस रूपये याप्रमाणे असून तसेच जगप्रशिद्ध अजिंठा लेणीचे तिकीट देशी पर्यटकास चाळीस रूपये असून पंधरा वर्षा आतिल मुलास विना तिकिट प्रवेश भारतीय पुरातत्व विभागाकडून दिला जातो.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: ३०६/२०२५.**

**अर्जदारः-** **१)** धृपतावाई काशीनाथ राठोड, वयः ७५ वर्षे, धंदाः शेती, **२)** राहुल काशीनाथ राठोड, वयः २७ वर्षे, धंदाः शेती. **३)** गजानन काशीनाथ राठोड, वयः २६ वर्षे, धंदाः शेती, **४)** जवीबाई कैलास जाधव, वयः-४१ वर्षे, धंदाः शेती, **५)** रणजीत काशीनाथ राठोड (मयत) **५-१)** कवीता रणजीत राठोड, वयः ३८ वर्षे, धंदाः शेती. **५-२)** काजल रणजीत राठोड, वयः १८ वर्षे, धंदाः शिक्षण, **५-३)** पवन रणजीत राठोड, वयः १७ वर्षे, धंदाः शिक्षण, अ. पा. क. अर्जदार नं. ५-१. **५-४)** जिवन रणजीत उर्फ राणीदास राठोड, वयः १५ वर्षे, धंदाः शिक्षण, अ. पा. क. अर्जदार नं. ५-१. वरील सर्व अर्जदार रा. वरखेडी (बु) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).... **६)** मिराबाई उत्तम चव्हाण, वय :४५ वर्षे, धंदा : शेती. **७)** कवीताबाई उत्तम चव्हाण, वयः ३८ वर्षे, धंदाः शेती. अर्जदार नं. ०६ व अर्जदार नं. ०७ रा. लिहे दिगर ता. जामनेर जि. जळगांव.

**// विरूध्द //**

**निरंक, गैरअर्जदारः-**

**अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे काशीनाथ शंकर राठोड हे दिनांक ११/०८/२०२२ ला मौजे वरखेडी बु. ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

**(पुढील दिनांकः- ०७/०१/२०२६).** तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी. हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक : २९/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-** **विभागीय लिपीक** | शिक्का | **आदेशावरून सही/- सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव**

## जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

**दि.कि.अर्ज नं.५६३/ २०२५**

अर्जदार: १. गणेश पि. भावलाल बेडवाल, वय ५३ वर्ष, धंदा शेती, रा. खापरखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. कार्तीक पि. गणेश बेडवाल, वय १७ वर्ष, धंदा शिक्षण, (अ.प.क. अर्जदार नं. १) रा. खापरखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. रणवीरसिंग पि. गणेश बेडवाल, वय १५ वर्ष, धंदा शिक्षण, (अ.प.क. अर्जदार नं. १) रा. खापरखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द गैरअर्जदार :

प्रकरण : निरंक

अर्जदार नं. १ ते ३ हे मयत ज्योती गणेश बेडवाल हिचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोरसे, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं. २ ते ३ यांची आई ही मयत ज्योती गणेश बेडवाल ही होती व ती मौ. खापरखेडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होती. ती अल्पश्या आजाराने दि. २३/५/२०२५ मध्ये मयत झालेली आहे. तिस कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ३ हे होते व आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. त्याबाबत त्यांचे मृत्यु प्रमाण पत्र सोबत दाखल केले आहे. तसेच सदर वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व अन्य कामा करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ३ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ते ३ हे एकाच कुटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ३ यांची स्वइच्छेप्रमाणे संमत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार नं. १ ते ३ हे मयत ज्योती गणेश बेडवाल हिचे कायदेकशीर वारस आहे. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. आज दि. २४/११ २०२५ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

**कनिष्ठ लिपीक.**

**आदेशावरुन, व्हीः रामःपाथ्वरे सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, क ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

जाहीर प्रगटन / सायटेशन नोटीस

मा. श्रीमती. एस. एस. अग्रवाल, सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर

प्रकरणात पुढील तारीख २९/०१/२०२६

सिव्हील एम.ए. क्रं. ८०४/२०२५

अर्जदार:- जुबेदा पिता अमर बागानुन
वय - ५६ वर्षे, धंदा - निरंक
रा. जुने पोस्ट ऑफीस जवळ, फकीर गल्ली, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण :भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेबाबत.

आणि

बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदार हिने या न्यायालात ड. आफताब एस. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये सक्सेशन सर्टिफिकेट आणि बॉम्बे रेगुलेशन क्ट तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला की,अर्जदार वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणार असून अर्जदाराचे वडील नामे अमर हमद बागानून हे दिनांक २८/१०/१९९८ रोजी गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे मनाबी अमर बागानून दिनांक ०६/०७/२०२० रोजी वृध्दपकळाने राहत्या घरी मौजे फकीर गल्ली, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार हिला डोळ्याने दिसन नसल्यामुळे म्हणजेच अर्जदारही अंध असल्याने अर्जदाराचे लग्न झालेले नसून ती अविवाहीत आहे. अर्जदाराचे वडील मयत अमर हमद बागानून है। जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर अंतर्गत पंचायत समिती कार्यालय, गंगापूर येथे शिपाई या पदावर कार्यारत होते. त्यांच्या मृत्युनंतर कनिष्ठ प्रशासन अधिकारी

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**मा.३ रे दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय वैजापूर ता. वैजापूर**

सिव्हिल एम ए. क्र ३२९ /२०२५

अर्जदार :- १) शाहबाई अ. यव्हान पोळ वय ७९ वर्ष धंदा घरकाम रा. घायगाव ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर २) मिना अ. गौतम कदम वय ५५ वर्ष धंदा घरकाम रा. सुरेगाव ता. येवला जि.नाशिक ३) सोनुबाई अ. सुरेश कदम वय ४५ वर्ष धंदा घरकाम रा. सुरेगाव ता. येवला जि नाशिक ४) रंजना प्र. दिलीप पोळ वय ५८. वर्ष धंदा घरकाम रा. घायगाव ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर ५) ऋषिकेश पि. दिलीप पोळ वय २८ वर्ष धंदा. शेती रा. घायगाव ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर ६ ) ज्योति पि. दिलीप पोळ वय ३९ वर्ष धंदा घरकाम रा. घायगाव ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर ७) जयश्री प्र. शरद बनकर वय ३४ वर्ष धंदा घरकाम रा. चर्च जवळ, लासूर स्टे. ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर ८) संध्या भ्र. किशोर सातदिवे वयः ३२ वर्ष धंदा घरकाम रा. वैसपुर टाकळी ता. कन्नड जि छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध गैरअर्जदार : निरंक

प्रकरण. :- बॉम्बे रेगुलेशन क्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ड. व्ही. एस. मनोरकर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन असे की, यव्हन अर्जुन पोळ हे मौजे रा. घायगाव ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते व ते दिनांक ०७/११/२०१७ रोजी घायगाव ता. वैजापूर येथे मयत झाले असून त्याचे माघारी पत्नी अर्जदार क्र. १ व विवाहित मुली अर्जदार क्र. २ व ३ असे वारस असून त्यांचा एकमेव मुलगा नामे दिलीप यव्हन पोळ हा देखील दि. ०७/०८/२०१५ रोजी मरण पावला असून त्याचे माघारी त्यास पत्नी अर्जदार क्र. ४ व मुलगा अर्जदार क्र. ५ आणि विवाहित मुली अर्जदार क्र. ६ ते ८ असे वारस आहेत. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केलाआहेत. तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर-उजर या न्यायालयात असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्कयानी आज दिनांक २०/११/ २०२५ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपीक**

**आदेशान्वये सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय क स्तर वैजापूर**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अखेर नखे बाहेर काढलीच!

भोपाळ येथे शनिवारी झालेल्या या घटनेने देशाचे लक्ष वेधले आहे. जमियत-उलेमा-ए-हिंद या संघटनेच्या राष्ट्रीय नियामक मंडळाची बैठक झाली. बैठकीत संघटनेचे देशभरातील सारे मौलाना आणि कार्यकर्ते उपस्थित होते. वास्तविक पाहता महमूद मदनी हे इतर मौलानांपेक्षा मवाळ आणि सर्व घटकांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. कधीकाळी ते सद्भावना संसदेचे आयोजन करीत असत आणि जेव्हा देशात दहशतवादी घटना व्हायच्या, तेव्हा ते दहशतवादविरोधी परिषदा घ्यायचे. पण, हा काळ काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा होता. त्यांचे वडील मौलाना असद मदनी हे मुस्लिम समाजातील मोठे प्रस्थ होते. या मदनी घराण्याचा संबंध सहारणपूर येथील दारूल उलूम देवबंदशी आहे. असद मदनी हे तब्बल १७ वर्षे राज्यसभेचे खासदार होते. मुस्लिमांचे लांगूलचालन करण्यासाठी काँग्रेस आणि त्यांचे समविचारी पक्ष मुस्लिम धार्मिक नेत्यांना राज्यसभेवर पाठवायचे. महमूद मदनी हे असद यांचेच पुत्र आहेत. त्यांचे शिक्षण अर्थातच दारूल उलूम देवबंदमध्येच झाले. काँग्रेस आणि यूपीए सरकारच्या काळात धर्माच्या नावाने सतत दंगेधोपे व्हायचे. जाळपोळ, लुटालूट व्हायची. अशावेळी महमूद मदनी हे दहशतवादविरोधी परिषदा घ्यायचे तसेच सद्भावना संसदेचे आयोजन करून सर्व धर्मांच्या धार्मिक व्यक्तींना मंचावर बोलवायचे. दंगलीच्या काळात मुस्लिमांच्या विरोधात हिंदूच्या मनात उफाळलेल्या संतापाच्या आगीवर पाणी टाकण्याचे कार्य या माध्यमातून असद आणि महमूद मदनी करायचे. हिंदूंनी काहीही झाले तरी दंगलीचे घाव निमूटपणे सहन करीत शांत बसावे, असे हिंदू धर्मीयांच्या तोंडून वदवून घेण्याचे काम सद्भावना संसदेच्या माध्यमातून केले जात असे. मदनी यांच्या कार्यक्रमांना तत्कालीन सरकार मोठी प्रसिद्धीही देत असे. महमूद मदनी यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाची फळेही चाखली आहेत. उत्तर प्रदेशातून राष्ट्रीय लोकदलाने त्यांना खासदार केले होते. २०२३ मध्ये जगभरातील जे ५०० प्रभावशाली मुस्लिम धार्मिक नेते होते, त्यात महमूद मदनी यांचा समावेश होता. जॉर्डनमधील अम्मान येथील इस्लामिक संस्थेने जारी केलेल्या यादीत महमूद यांच्या नावाचा समावेश केला होता. २०१४ पूर्वी मदनी कुटुंबीयांसाठी सर्व काही ठीक होते; त्यानंतर मात्र, मदनी परिवाराला शासकीय पातळीवर कुणी विचारायला तयार नाही. जे हाल दिल्लीतील जामा मशिदीचे रखवाले बुखारी परिवाराचे सुरू आहेत, तेच हाल सध्या मदनींचे आहेत. देशवासीयांनी असाही काळ पाहिला की, निवडणूक आली की काँग्रेससह झाडून तथाकथित सेक्युलर पार्टीवाले बुखारींच्या पाया पडायला जायचे. लोडावर बुड टेकवून फतवे काढत, अमुक पक्षालाच मतदान करण्याचे आवाहन करवून घेण्याचे दिवस जागरूक आणि सुज्ञ मतदारांनी आता संपवले आहेत. झोपलेला बहुसंख्य हिंदू समाज, काही प्रमाणात का होईना, जागा होत आहे. कुठेच डाळ शिजत नसल्याने आणि काहीच मनासारखे होत नसल्याने महमूद मदनी यांची अस्वस्थता भोपाळ येथील जमियत-उलेमा-ए-हिंदच्या बैठकीत उफाळून आली. त्यांनी सर्वोच्च न्यायालयावरच थेट हल्ला चढविला. म्हणजे मनासारखे निर्णय आले, की न्यायालये चांगली आणि उलट निर्णय दिले की संविधान खतरे में! केंद्र सरकारवरही टीका करीत त्यांनी थेट जिहाद म्हणजेच धर्मयुद्धाची धमकी देऊन टाकली. सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा १९८४ मध्ये शहाबानो प्रकरणात कायद्यानुसार निर्णय दिला होता, तेव्हा का लाखो मुस्लिम दिल्लीच्या रस्त्यावर उतरले आणि निर्णय बदलायला लावला? असे अनेक प्रश्न मदनीसारख्यांना विचारता येतील. जिहादची धमकी देऊन मदनी यांनी त्यांना मानणाऱ्या मुस्लिमांना एकप्रकारे चिथावणी दिली आहे. पण, याचे उलटे परिणाम होऊ शकतात, याची जाणीव त्यांनी ठेवायला हवी. तीन तलाक, बाबरी मशीद प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांचे उदाहरण देत त्यांनी स्फोटक विधाने केलीत. अनेक मुस्लिम देशांमध्ये तीन तलाकची पद्धत नसताना धर्मनिरपेक्ष भारतात ती का असावी? कुठलाही सभ्य समाज अशाप्रकारचे सामाजिक बंधन स्वतःवर लादून घेणार नाही. बाबरीवर बोलताना मदनी यांनी एकप्रकारे बहुसंख्य समाजालाच अप्रत्यक्षरीत्या लक्ष्य केले. पण, अयोध्येतील राममंदिर तोडूनच बाबरीची निर्मिती करण्यात आली हे मदनी सोयीस्करपणे विसरतात. त्यांनी देशातील लोकसंख्येचेच विभाजन करून टाकले. वेगवेगळ्या कारणांमुळे का होईना, केवळ दहा टक्के नागरिक मुस्लिमांच्या बाजूने असून ३० टक्के विरोधात आहेत. आणि ६० टक्के नागरिक ना मुस्लिमांच्या बाजूचे आहेत ना विरोधात. त्यांनी लोकसंख्येची ही जी विभागणी केली, त्यातून त्यांना हेच सांगायचे असावे की काही राजकीय पक्ष केवळ सत्तेसाठी मुस्लिमांच्या बाजूने आहेत. ३० टक्के लोकसंख्या विरोधात आहे म्हणजेच ही जनताच दिल्ली कुणाच्या हाती असावी हे ठरविते आणि हे कोण आहेत हे सांगण्याची गरज नाही. समझने वालों को इशारा काफी होता है.

मुस्लिमांच्या विरोधात नकारात्मक धारणा देशात तयार होत असल्याचे विधान मदनी यांनी केले. पण, याला जबाबदार कोण आहे? दिल्ली बॉम्बस्फोटानंतर देशात संतापाची सुप्त लाट उसळली आहे आणि विविध समाजमाध्यमे आणि काही राजकीय, धार्मिक नेते ज्याप्रकारे दहशतवाद्यांचे उघडपणे समर्थन करीत आहेत, ते पाहून नकारात्मक भावना वाढणार नाही तर काय होणार? फिलिस्तीनसाठी रॅली काढणाऱ्यांनी दिल्ली बॉम्बस्फोटाच्या विरोधात एक तरी रॅली काढली का? सर्व काही डोळ्यासमोर दिसत असतानाही दहशतवाद्यांचे अप्रत्यक्षपणे समर्थन केले जात असेल तर बहुसंख्य समाजाच्या मनात शंका आणि राग उत्पन्न होणे नैसर्गिक आहे. या देशाच्या फाळणीचे कारण हे राजकीय किंवा आर्थिक नव्हते तर पूर्णपणे धार्मिक होते. फाळणीनंतर उरलेला देश कुणाचा हे उघड असतानाही बहुसंख्यकांच्या विरोधात विधाने करून मदनीसारखे नेते त्यांच्या समाजाचेच नुकसान करीत आहेत. आतापर्यंत महमूद मदनी जे दहशतवादविरोधी परिषदा आणि सद्भावना संसदेचे आयोजन करीत होते, ते सर्व फोल आणि दिखाऊपणाचे होते, हेच मदनी यांनी भोपाळमध्ये जे विषारी फूत्कार सोडले त्यावरून उघड झाले आहे. एसआयआर, बुलडोजर कारवाई आणि वक्फ सुधारित कायदा आदी मुद्यांचा आधार घेत एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केले जात असल्याची ओरड त्यांनी केली. मतदारयादी पुनरावलोकन प्रक्रिया सर्वांसाठी लागू आहे. ती कुण्या एका समुदायासाठी नाही. खरे तर हे मतदारयाद्यांचे एकप्रकारे शुद्धीकरण आहे. पण, या प्रक्रियेलाही धार्मिकतेचा रंग दिला जात आहे. काही राज्यांनी लागू केलेले धर्मांतरविरोधी कायदे मदनी यांच्या पचनी पडलेले नाहीत. धर्मांतरविरोधी कायदे म्हणजे नागरिकांच्या धार्मिक अधिकाराचे उल्लंघन असल्याचे मदनींना वाटते. पण, असे कायदे करण्याची गरज का पडली यावर कुणीही बोलण्यास तयार नाही. उत्तर प्रदेशातील छांगुर बाबा प्रकरण पाहता, देशात असे कितीतरी छांगुर आहेत, जे हिंदू धर्माला पोखरण्याचे काम करीत आहेत. घरवापसीलाही मदनींनी विरोध दर्शविला. पण, हिंदूंचे धर्मांतर केले जात आहे त्याच्या विरोधात मदनी यांनी परिषदेत एक शब्दही उच्चारला नाही. जबरदस्ती किंवा आमिष दाखवून धर्म परिवर्तन केलेल्यांची हिंदू धर्मात घरवापसी केली तर मदनींच्या पोटात दुखण्याचे कारणच काय? खरे तर मदनी यांनी सर्वोच्च न्यायालय, सरकार आणि बहुसंख्य हिंदूंना लक्ष्य करीत स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेतला आहे. त्यांनी जी विधाने केली आहेत, त्याचा फायदा बहुसंख्यकांच्या जागृतीसाठीच होणार आहे. मदनी ज्याप्रमाणे एकतर्फी विचार करतात, तसा हिंदू धार्मिक नेते आणि पुढारी करीत नाहीत. या देशात आता धर्माच्या आधारावर राजकारण करण्याचे आणि आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचे दिवस संपले आहेत. भोपाळमध्ये मदनी यांनी जी नखे बाहेर काढली आहेत, त्यामुळे त्यांनाच जखमा होणार आहेत, इतरांना नाही. बहुसंख्य समाज समंजस आहे. त्या समाजानेही त्यांचा असली चेहरा आता पाहिला आहे; तो सर्वांनी लक्षात ठेवावा एवढेच!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# हिवाळी अधिवेशनात 'चंदीगड'!

डिसेंबर महिन्यात प्रथमच सुरू होत असलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात वेगवेगळे विषय उपस्थित होणार असले तरी या अधिवेशनाचा केंद्रबिंदू- 'चंदीगड' हा राहण्याची चिन्हे आहेत आणि याचे कारण आहे या केंद्रशासित प्रदेशासाठी स्वतंत्र नायब राज्यपाल नियुक्त करण्यासाठी सरकारतर्फे मांडले जाणारे विधेयक.

चंदीगड हे देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या स्वप्नातील शहर म्हणून ओळखले जाते. फ्रान्सचा वास्तुविशारद ली कॉरबिसीयर याने या शहराची उभारणी केली. नंतर हे शहर वादाच्या भोवऱ्यात सापडले. हरयाणा आणि पंजाब ही दोन्ही राज्ये या शहरावर दावा सांगू लागली. आणि मग यावर तोडगा म्हणून चंदीगडला केंद्रशासित प्रदेश करण्यात आले आणि त्याचवेळी ते या दोन्ही राज्यांची राजधानी म्हणूनही काम करू लागले. दोन राज्यांची राजधानी असणारे हे देशातील एकमेव शहर आहे. मागील काही वर्षांत चंदीगडचा वाद थंडावला होता. त्या चंदीगडच्या संदर्भात केंद्र सरकारने या अधिवेशनात एक घटनादुरुस्ती विधेयक मांडण्याचा निर्णय घेतला आहे.

**१३१ वी घटनादुरुस्ती** : देशाच्या घटनेत १३१ वी घटनादुरुस्ती करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने मांडला असून, त्यात या शहरासाठी नायब राज्यपाल नियुक्त करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. मात्र या केंद्रशासित शहराला विधानसभा असणार नाही. जम्मू- काश्मीर, पाँडेचेरी हेही केंद्रशासित भाग आहेत आणि तेथे विधानसभा असूनही नायब राज्यपाल अस्तित्वात आहेत. याउलट अंदमान- निकोबार, लक्षद्वीप, दादरा नगर हवेली, दमण-दीव या केंद्रशासित भागांना नायब राज्यपाल असले तरी तेथे विधानसभा अस्तित्वात नाही. चंदीगडसाठी नायब राज्यपाल नियुक्त केला जाणार असला तरी तेथे राज्य विधानसभा राहणार नाही.

**वाद सुरू** : सरकारतर्फे मांडल्या जाणाऱ्या या विधेयकाची माहिती समोर येताच पंजाबमधील राजकीय पक्षांनी त्यावर आक्षेप घेणे सुरू केले आहे. जेव्हा हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत मांडले जाईल, त्यावर वादंग होण्याची चिन्हे आहेत. चंदीगड शहराच्या जन्मापासूनच या शहराला वादविवादचा शाप लाभला असावा असे दिसते.

आजवर पंजाबचे राज्यपाल हेच चंदीगडचे प्रशासक म्हणून काम करीत असत. आता केंद्र सरकारने चंदीगडसाठी वेगळा नायब राज्यपाल नेमण्याचा निर्णय का घेतला आहे याचे स्पष्टीकरण सरकारकडून केले जाईल. हे विधेयक पारित झाल्यावर चंदीगड हे दोन राज्यपाल व एक नायब राज्यपाल अशा तिघांचे मुख्यालय असेल.



**वाद नको** : चंदीगडबाबत नवा वाद निर्माण होणे योग्य ठरणार नाही अशी सर्वसाधारण भावना व्यक्त केली जात आहे. सरकारच्या या निर्णयानंतरही चंदीगड पंजाबची राजधानी राहणार असली तरी, आपल्यापासून चंदीगड हिसकावून घेतले जात आहे असा विषारी प्रचार राज्यात सुरू केला जाण्याची शक्यता आहे. आणि पंजाब व जम्मू-काश्मीर ही दोन संवेदनशील राज्ये आहेत. या राज्यांबाबत निर्णय घेण्याचा भारत सरकारला पूर्ण अधिकार असला तरी त्याचे आंतरराष्ट्रीय पडसाद उमटतात हे अनुभवाने सिद्ध झाले आहे. भारत सरकारने लडाखला केंद्रशासित प्रदेश घोषित केले, त्यानंतर गल्वान घडले. लडाखच्या या भागात चीन-भारत सैनिकांमध्ये रक्तरंजित चकमक झडली. पंजाबमधील घटनांचे पडसाद ब्रिटन, कॅनडा, अमेरिकेत उमटतात. भारत सरकारने याचा सारासार विचार करूनच हे विधेयक मांडण्याचा निर्णय घेतला असावा असे मानले जाते.

**आणखी एक विधेयक** : संसदेच्या या अधिवेशनात आणखी काही विधेयके मांडली जाणार असली तरी यातील आणखी एक विधेयक वादाचे ठरण्याची शक्यता आहे आणि ते म्हणजे आण्विक ऊर्जा क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले करण्याचा निर्णय. आण्विक ऊर्जा हा देशाच्या ऊर्जा निर्मितीचा एक महत्त्वाचा भाग असला तरी आजवर तो फक्त सरकारी नियंत्रणात होता. आता हे क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले केले जाणार आहे. यात काही गंभीर धोके असल्याचे तज्ज्ञांना वाटते. सरकारी गोटातही याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आण्विक ऊर्जा प्रकल्पांसाठी सुरक्षेचे मानक फार जास्त असतात, त्याची अंमलबजावणी खाजगी क्षेत्रात केली जाऊ शकेल काय, याबाबत तज्ज्ञांमध्ये शंका व्यक्त केली जात आहे. कारण खाजगी क्षेत्राचा अनुभव फार समाधानकारक नाही. खाजगी क्षेत्रांमध्ये सुरू होणाऱ्या ऊर्जा प्रकल्पाच्या सुरक्षेत गडबड झाल्यास आण्विक उत्सर्जनाचा नवा धोका निर्माण होऊ शकतो.

**प्रश्न युरेनियमचा** : आण्विक ऊर्जा प्रकल्पात युरेनियमचा वापर केला जातो. यासाठी ५ ते ६ टक्के शुद्ध युरेनियम पुरेसे असते. मात्र, हेच युरेनियम ९० टक्के शुद्ध करण्यात आल्यावर त्याचा वापर आण्विक शस्त्रांसाठी केला जातो. खाजगी क्षेत्रासाठी हे क्षेत्र खुले करण्यात आल्यास या क्षेत्राला युरेनियम आयात करण्याची परवानगी द्यावी लागेल. हे युरेनियम चुकीच्या हाती लागणार नाही याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. या जोखमीच्या क्षेत्राला खाजगी क्षेत्रासाठी खुले करणे योग्य होणार नाही हे जे मत व्यक्त केले जात आहे त्यामागे हेही एक कारण असल्याचे म्हटले जाते. सरकारी गोटातून मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने या साऱ्याचा सारासार विचार करून हा निर्णय घेतला आहे. यासाठी आवश्यक ते खबरदारीचे उपाय योजण्यात आले आहेत. या युरेनियमचा कोणताही गैरवापर होण्याची कोणतीही शक्यता सरकारला वाटत नाही.

**योग्य निवाडा** : सरन्यायाधीश पदावरून पायउतार होताना न्या. भूषण गवई यांच्या खंडपीठाने एक योग्य निवाडा देत सर्वोच्च न्यायालयाचाच एक निर्णय फिरविला. एप्रिल महिन्यात न्या. पारडीवाला यांच्या खंडपीठाने तामिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल म्हणजे केंद्र सरकार या खटल्यात राष्ट्रपती व राज्यपालांवर त्यांच्याकडे आलेल्या विधेयकांना विशिष्ट कालावधीत मंजुरी देण्याचे बंधन घातले होते. तामिळनाडू विधानसभेने पारित केलेल्या काही विधेयकांना राज्यपाल रवि यांनी मंजुरी न देता त्यांना थंड्या बस्त्यात टाकले होते. त्या विरोधात तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. यावर निवाडा देताना न्या. पारडीवाला यांनी राष्ट्रपती व राज्यपालांनी त्यांच्याकडे आलेल्या विधेयकांना एका कालावधीत मंजुरी न दिल्यास, त्या विधेयकांना मंजुरी मिळाली आहे असे मानले जाईल असे म्हटले होते. या निर्णयावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कलम १४३ (१) अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाकडे अभिमत मागितले होते. ते देताना न्या. गवई यांच्या घटनापीठाने न्या. पारडीवाला यांच्या खंडपीठाचा निर्णय फिरविला. राष्ट्रपती व राज्यपाल यांच्यासाठी अशी कोणतीही कालमर्यादा घालून देता येणार नाही असे मत देताना घटनापीठाने म्हटले आहे, राज्यघटनेत अशी कोणतीही तरतूद नाही आणि 'विधेयकाला मंजुरी मिळाली' असे मानले जाईल हे तर कुठेच नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे ही भूमिका स्वीकारता येणार नाही. मात्र, त्याचवेळी राज्यपालांनी राज्य विधानसभांनी पारित केलेल्या विधेयकांची मंजुरी रोखून ठेवणे योग्य होणार नाही अशीही समतोल भूमिका घेतली. एकतर राज्यपालांनी विधेयकास मंजुरी द्यावी, विधेयक फेरविचारासाठी राष्ट्रपतींकडे सोपवावे वा मग राज्य विधानसभेकडे ते परत पाठवावे हे तीनच पर्याय घटनेत सांगण्यात आले आहेत. बेमुदत कालावधीसाठी विधेयक रोखून ठेवणे योग्य होणार नाही असे स्पष्ट प्रतिपादन घटनापीठाने आपल्या अभिमतात केले आहे. न्या. गवई यांच्या घटनापीठाने दिलेले हे अभिमत केंद्र व राज्य सरकारांसाठी मार्ग दाखविणारे 'दीपस्तंभ' ठरावे.


## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# १.७ कोटी मतदार निवडणार २८८ नगराध्यक्ष

महाराष्ट्रात सध्या नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. काही ठिकाणी चिन्ह वाटपास विलंब झाल्याने अपक्षांवर अन्याय होऊ नये म्हणून आयोगाने १ डिसेंबरच्या रात्री १० वाजेपर्यंत प्रचाराला मुभा दिली. राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या या निवडणुकीत २८८ नगराध्यक्ष आणि ६ हजार ८५९ नगरसेवक निवडले जाणार आहे. तब्बल १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार हक्क बजावणार असून यात ५३ लाख ७९ हजार ९३१ पुरुष तर ५३ लाख २२ हजार ८७० महिला मतदारांचा समावेश आहे. इतर ७७५ मतदारही मतदान करणार आहे. विशेष म्हणजे, ४० नगरपालिका आणि १७ नगरपंचायतींनी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने अशा ठिकाणच्या निवडणुकांना स्थगिती न देता या निवडणुकांचे निकाल जानेवारीत होणाऱ्या न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहील, असे सांगितल्याने येथेही निवडणुका होत आहे. परंतु, काही ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे निवडणुका रद्द होण्याची शक्यता आहे.

भाजपाचे १०० नगरसेवक आणि ३ नगराध्यक्ष याआधीच अविरोध निवडून आले आहे. २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबरला मतमोजणी असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे. बहुतांश ठिकाणी युती आणि आघाडी नसल्याने उमेदवारांची संख्या वाढली आहे. त्यातही नाराजी-नाट्य रंगल्याने नेमका कोण निवडून येईल, हे निकालानंतरच स्पष्ट होईल. भाजपा, काँग्रेस, शिवसेना, राकाँ अजित पवार, राकाँ शरद पवार, उबाठा, वंचित बहुजन आघाडी, बसपा आणि अन्य अनेक छोट्या-मोठ्या पक्षांनी आपापले उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. शिवाय मोठ्या संख्येने अपक्ष नशीब आजमावत असल्याने या निवडणुकीत गोंधळाची स्थिती आहे. प्रत्येकच प्रभागात उमेदवारांची संख्या प्रचंड वाढली आहे. कुठे डझनभर तर कुठे त्यापेक्षाही अधिक उमेदवार रिंगणात आहे. विदर्भात भाजपाकडे मोठा जनाधार आहे. परंतु, सोबत मित्र पक्षांचे उमेदवारही रिंगणात असल्याने मतविभागणीची शक्यता आहे. अशाही परिस्थितीत बहुतांश ठिकाणी भाजपा आणि काँग्रेस या दोनच पक्षांत थेट लढत असल्याचे जाणकार सांगतात. २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० ही मतदानाची वेळ आहे. १३ हजार ३५५ केंद्रांवर मतदान होणार असून १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिट उपलब्ध करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी ६६ हजार ७७५ अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात आले आहे. भाजपाच्या अविरोध ठरलेल्या नगरसेवकांमध्ये विदर्भ ३, मराठवाडा ३, कोकण ४, उत्तर महाराष्ट्र ४९ आणि पश्चिम महाराष्ट्रातील ४१ नगरसेवकांचा समावेश आहे. ही निवडणूक नागपूर विभागातील ५५ नगरपालिका व नगरपंचायती, अमरावती ४५, पुणे ६०, नाशिक ४९, संभाजीनगर ५२ आणि कोकण विभागातील २७ नगरपालिका व नगरपंचायतींसाठी होत आहे. भाजपाने या निवडणुकीतही आपली सर्व शक्ती पणाला लावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभांमुळे उमेदवारांना विजयाची हमी वाटत आहे. स्टार प्रचारक प्यारे खान आणि जमाल सिद्दिकी हे अल्पसंख्यक समाजापुढे भाजपाची पारदर्शक भूमिका पटवून देण्यात यशस्वी झाले आहे. दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही आपल्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी ताकद लावली आहे. भाजपा, शिवसेना आणि अजित पवार यांच्या राकाँकडून विकासाच्या नावावर मते मागितली जात आहेत. दुसरीकडे काँग्रेस, राकाँ शरद पवार आणि उबाठाने आपले पारंपरिक मुद्दे पुन्हा प्रचारात आणले आहे. या निवडणुकीनंतर महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहे. एकूणच आगामी तीन-चार महिने संपूर्ण महाराष्ट्रात निवडणुकांचे वातावरण राहणार आहे.




९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# कर्ममार्ग सांगणारी भगवद्गीता

कुरुक्षेत्रावरील युद्धाच्या सुरुवातीला अर्जुन भगवंताला म्हणतो, ''आमच्याच कुटुंबीयांना मारून आम्ही सुखी कसे होऊ शकतो? कुळाचा नाश केल्यामुळे जे पाप आम्हाला लागणार आहे, त्यापासून आम्ही निवृत्त का होऊ नये? कुळाचा नाश झाल्याने निरंतर चालत आलेले कुलधर्म नष्ट होतात आणि धर्माचा नाश झाल्याने उरलेल्या संपूर्ण कुळाला अधर्म नष्ट करतो.'' पुढे तो म्हणतो, ''ही खूप आश्चर्याची आणि दुःखाची गोष्ट आहे की, आम्ही फार मोठे पाप करण्याचा निश्चय केला आहे. राज्य आणि सुखाच्या लोभाने आपल्या स्वजनांना मारण्यासाठी आम्ही तयार झालो आहोत.'' असे म्हणून, शोकाकुल मन असलेला अर्जुन बाणासहित धनुष्याचा त्याग करून युद्धभूमीत रथाच्या मध्यभागी बसतो. अशाप्रकारे, रथामध्ये बसलेल्या, भीतीने ग्रस्त झालेल्या आणि डोळ्यांमध्ये अश्रू आल्यामुळे जो बघूही शकत नाही, अशा अर्जुनाला भगवान म्हणाले, ''अरे! या अशा प्रसंगी तुला ही भीती जिचे श्रेष्ठ पुरुष कधीही सेवन करत नाहीत, जी स्वर्ग देणारी नाही, कीर्ती देणारी नाही, ती कशी काय प्राप्त झाली?'' आणि म्हणून ते त्याला म्हणतात ''क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप!'' हे अर्जुना, या नपुंसकतेचा अंगीकार करू नकोस, तुझ्यासाठी हे योग्य नाही. अंतःकरणातील या तुच्छ दुर्बलतेचा त्याग करून युद्धासाठी उभा राहा! पुढे ते अर्जुनाला म्हणतात-

''हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चयः।'' जर युद्धात तू मारला गेलास तर तुला स्वर्गाची प्राप्ती होईल आणि जर युद्धात तुझा विजय झाला तर तू पृथ्वीचे राज्य भोगशील. म्हणून, हे कुंतीनंदन, तू युद्धासाठी निश्चय करून सज्ज हो.

व्यक्तीसुद्धा आपल्या जीवनामध्ये अनेक वेळा, आपल्या सुखदुःखांप्रमाणे किंवा लाभ-हानीप्रमाणे, धर्माचा त्याला अपेक्षित असलेला अर्थ काढत असतो. अनेक वेळा, तो कर्तव्यापासून पलायन करणे हे कसे श्रेयस्कर आहे, ते स्वतःला व इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये अतिशय निःसंदिग्धपणे कर्तव्याचा मार्ग सांगितला आहे.

आज गीता जयंती सर्वत्र साजरी करण्यात येत आहे. कुरुक्षेत्रावर युद्धाच्या प्रसंगी अर्जुनाला उपदेश करताना भगवद्गीता प्रकट झाली. काही दिवसांपूर्वी नागपुरात एक कार्यक्रम झाला त्यामध्ये ज्यांना लोक पत्रकार आणि विचारवंत समजतात अशी एक व्यक्ती म्हणाली की, इतकी मोठी भगवद्गीता युद्धाच्या प्रसंगी सांगणे कसे शक्य आहे? वास्तविक पाहता भगवद्गीतेमध्ये एकूण ७०० श्लोक आहेत. यामध्ये अर्जुनाने विचारलेले सुद्धा काही प्रश्न आहेत. त्यामुळे हा संवाद होण्यासाठी दोन तास पुरेसे आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे की त्यावेळेस युद्ध सुरू झालेले नव्हते. युद्धासाठी दोन्ही सैन्य एकमेकांच्या समोर उभे राहिलेले होते. युद्ध सुरू झालेले नसल्यामुळे युद्धासाठी अर्जुनाला तयार करताना जर दोन तास गेले तर काही फार बिघडणार नव्हते. जगातील सर्वच भाषांमध्ये ज्या भगवद्गीतेचे भाषांतर झालेले आहे अशा ज्ञानाच्या अमोघ साठ्याबद्दल हे पत्रकार आणि विचारवंत असे बोलतात यावरून त्यांच्या बुद्धीची कीवच केली पाहिजे.

किंकर्तव्यमूढ होणे ही अवस्था आहे. ही अवस्था व्यक्तीच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या कोणाच्याही जीवनामध्ये उद्भवू शकते. त्यामुळे अशा अवस्थेच्या प्रत्येक माणसाला मार्गदर्शनाची आवश्यकता असते. आज आपण ऐन परीक्षेच्या वेळी ड्रॉप घेणारे म्हणजे परीक्षा न देणारे विद्यार्थी बघतो. ऐन मुलाखतीच्या वेळेला जे भयग्रस्त होतात व मुलाखत नीट देऊ शकत नाही असे पण विद्यार्थी बघतो. जीवनामध्ये कुठलेही भयाचे, क्रोधाचे, मोहाचे प्रसंग निर्माण झाल्यावर जे कर्तव्यच्युत होतात असेही लोक आपण बघतो. ज्याप्रसंगी जी कामगिरी करायला पाहिजे होती ती कामगिरी जे लोक करू शकत नाही असेही लोक आपण बघतो. या सर्वांसाठी भगवान श्रीकृष्णांचा उपदेश अत्यंत मौलिक आहे.

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात की, अर्जुना, तू क्षत्रिय आहेस. तुझा धर्म युद्ध करणे आहे. धर्मासाठी युद्ध करणे आहे. त्यामुळे तू कोणाशी युद्ध करतो आहे हे बघू नकोस, तर तू तुझ्या कर्तव्यावर लक्ष केंद्रित कर. आज सर्वत्र कर्तव्याचीच बोंब आहे. सर्वांना अधिकार पाहिजे आहेत. परंतु कर्तव्य नाही. अधिकारासाठी मोर्चे काढणारे लोक आहेत पण आम्ही आमचे कर्तव्य बजावू यासाठी बैठक घेणारेसुद्धा नाहीत. मोठ्या अधिकारपदावरची व्यक्ती आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून योग्य उमेदवाराला नियुक्त न करता तिच्या जवळच्या, नात्यातल्या उमेदवारांना नियुक्त करते. हे कर्तव्यच्युततेचे उदाहरण आहे. भगवद्गीतेचे हे श्लोक सरकारी व खाजगी कार्यालयांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये सुद्धा शिकविले गेले पाहिजेत. अर्जुनविषादयोग या अध्यायामध्ये भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाचे मन तयार केलेले आहे. कारण असे म्हटलेले आहे ''मन के हारे हार, मन के जीते जीत'' किंवा ''हारे मन से कोई खडा नहीं होता'' हरलेल्या मनाने कुठलेही युद्ध जिंकले जाऊ शकत नाही, हे भगवान श्रीकृष्णाला माहिती होते. म्हणून त्यांनी अर्जुनाचे मन सर्वप्रथम तयार केलेले आहे. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात ''यदा यदाही धर्मस्य'' ज्या ज्या वेळेला धर्माला ग्लानी येते त्या त्या वेळेला मी अवतार घेईल. आणि माझ्या अवताराचा प्रमुख उद्देश काय असेल तर साधू लोकांचे रक्षण म्हणजे सज्जनशक्तीचे रक्षण आणि जे दुर्जन आहेत या दुर्जनशक्तीचा संहार. त्यामुळे सज्जनशक्तीचे रक्षण हा प्रत्यक्ष भगवंताचा संकल्प आहे. दुर्जनशक्तीचा संहार हे प्रत्यक्ष भगवंताचे वचन आहे. त्यामुळे धर्म- अधर्माच्या लढाईमध्ये आपण कोणाचे पक्षधर आहोत, आपण कोणत्या बाजूने उभे आहोत हे बघणे अतिशय आवश्यक आहे. संघाच्या प्रार्थनेमध्ये सुद्धा ''विधायास्य धर्मस्य संरक्षणम्'' असे म्हटलेले आहे. म्हणजे धर्माचे संरक्षण करणे हे आमचे प्रथम कर्तव्य आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे.

मार्गशीष शुद्ध एकादशी या दिवशी भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीता सांगितलेली होती. त्यामुळे हा दिवस गीता जयंती म्हणून साजरा केला जातो. अनेक साधू-संत हे कार्य करीत असतात. परंतु भगवद्गीता संस्कृतमध्ये असल्यामुळे सुद्धा अनेक लोक त्याला वाचायला धजत नाही. परंतु आम्ही हे लक्षात घेतले पाहिजे की, आज आमचे विद्यार्थी फाडफाड इंग्रजी बोलू शकतात. अनेक विद्यार्थी जर्मन, जपानी, फ्रेंच इत्यादी भाषांचा सुद्धा अभ्यास करतात. एकेकाळी जगातील विद्वान भारतामध्ये येऊन भारतातील विविध ग्रंथांचा अभ्यास करायचे. त्यासाठी त्यांना संस्कृत भाषा शिकावी लागायची. संस्कृत आमचीच भाषा आहे. ही भाषा आम्ही शिकली पाहिजे. एकमेकांना शिकविली पाहिजे. भगवद्गीता हा आमचा ग्रंथ आहे. ती आम्ही शिकली पाहिजे व इतरांना शिकविली पाहिजे. जगाची एक पंचमांश लोकसंख्या आमची आहे. शंभर कोटी लोक जर भगवद्गीता शिकतील तर संपूर्ण जगच भगवद्गीता शिकेल व ''कृण्वन्तो विश्वमार्यम्'', आम्हाला संपूर्ण जगाला श्रेष्ठ बनवायचे आहे, ही आमच्या पूर्वजांची घोषणा सार्थक ठरेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## निवडणुकीत कशाला हवा डीजे?

नगर परिषद, नगर पंचायतची निवडणूक २ डिसेंबरला होणार आहे. त्याचा प्रचार शिगेला पोचला आहे. प्रचाराकरिता आजकाल डीजेचा सर्रास वापर प्रत्येक पक्ष करीत आहे. यात इतक्या मोठ्या आवाजारत निवडणुकीची गाणी वाजवतात की लोक बहिरे होण्याची वेळ आली आहे. त्या आवाजाने लोकांच्या घरातील भांडी पडतात, आजारी, वृद्ध लोकांच्या हृदयाची धडधड वाढते, अभ्यास करणाऱ्याचे लक्ष विचलित होते. यामुळे मतदार हैराण झाला आहे. त्यात आता प्रचाराची मुदत १ डिसेंबरपर्यंत करण्यात आली आहे. म्हणजे अजून एक दिवस (रात्री १० पर्यंत) कानठळ्या बसणारा आवाज सहन करावा लागेल. मुदतवाढ देताना डीजेचा त्रास मतदारांना होईल याचा विचार कोण करणार?



**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

## वाचक पत्रे

### साधुग्राम : तंबू खोडांभोवतीच उभारावेत

नाशिकमध्ये २०२६-२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्याकरिता साधू-महंतांच्या निवासव्यवस्थेसाठी १२०० एकर जागेवर साधुग्रामची उभारणी प्रस्तावित असून त्यासाठी तेथील १८२५ झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात येणार, अशी बातमी आहे. त्याविरोधात वृक्षप्रेमी, पर्यावरणप्रेमींनी आंदोलन सुरू केले असून ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे हेदेखील त्यात सहभागी होत आहेत. साधुग्राममध्ये २२० कोटींच्या पीपीपी तत्त्वावरील प्रस्तावित कमर्शियल पार्क प्रकल्पासाठी ठेकेदाराला तपोवनातील जागा उपलब्ध करून देण्यासाठीच वृक्षतोडीचा घाट घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र ही प्रस्तावित वृक्षतोड टाळण्यासाठी एक साधा उपाय आहे. गावखेड्यांतून एसटी स्टॅण्डच्या जवळपास अशी काही हॉटेल्स, रसवंतीगृहे असतात, ज्यांचे छत एखाद्या झाडाच्या खोडा/बुंध्याभोवतीच तयार केलेले असते. हा देशी जुगाड (चांगल्या अर्थाने) अनुकरणीय आहे. काही ठिकाणी तर सिमेंट काँक्रीटची स्लॅबदेखील झाडाच्या खोडाभोवती, योग्य ती काळजी घेऊन साकारलेली असते. अशा प्रकरणांत झाड संरक्षित राहतेच, पर्यावरणाचे रक्षण होते, शिवाय झाडाच्या सावलीचा छतांना उपयोग होतो. अशी उदाहरणे डोळ्यांसमोर ठेवण्यात यावीत आणि साधुग्राम/तपोवनातील एकही छोटे मोठे वृक्ष न तोडता साधू-महंतांसाठी तंबू, राहुट्या, कुटीर इत्यादी निवासस्थाने वृक्षांच्या खोडांभोवतीच उभारण्यात यावीत. झाडांखालील जमिनींचे सपाटीकरण, समतलीकरण करावे लागेल, ते करतानासुद्धा जिथे झाडांची मुळे जमिनीच्या वर आलेली असतील तिथे त्यांना धक्का न लावता ते काम करता येईल. रस्ते, महामार्ग इत्यादी बांधताना वा त्यांचे रुंदीकरण करताना झाडे पाडणे अनिवार्य व समर्थनीय असते, मात्र निवासस्थाने तयार करण्यासाठी झाडे पाडणे अजिबात आवश्यक नाही. तेव्हा शासनाने वरील मार्गाचा अवलंब करून एकही वृक्ष न तोडण्याचे ठरविल्यास इच्छुक ठेकेदार आणि संबंधित प्रशासनातील व लोकप्रतिनिधींमधील टक्केवारीसम्राट नाराज होतील. पण शासनाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून व्यापक देशहिताचा, समाजहिताचा आणि पर्यावरण रक्षणाचा विचार करून वृक्षतोड टाळावी.

**अविनाश वाघ**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-८९

सोमवार, १ डिसेंबर २०२५

### उचलतो म्हणूनि बेलभंडार

उचलतो म्हणूनि बेलभंडार ॥धृ.॥

यवनांनी थैमान मांडुनी, स्वदेश लुटिला दोन हातांनी
प्रतिकाराला पुढे न कोणी उच्छेदाचे सत्र चालले चहूकडे अनिवार ॥१॥

दास्याचा ये संतत प्रत्यय, कर्तृत्वाचा करुनी विक्रय
शक्तियुक्तिने बांधव निर्भय यवनांचे उभविती मनोरे काय विचित्र प्रकार ॥२॥

परतविण्या ही लाट यावनी, रजपूत बांधव मेले लढुनी
शिंपियली रक्ताने अवनी व्यर्थचि कां ते जाऊ द्यावे भगिनींचे जोहार? ॥३॥

सत्तेचा जंव उलटे फासा, बुडे धर्म संस्कृती स्वभाषा
दिसे जीवनी कुणा न आशा फुलवायाला पुन्हा सजे मी स्वत्वाचा अंगार ॥४॥

तन मन धन हे सर्व समर्पून, ध्येयास्तव झिजविणार जीवन
विश्रांतीचे विचार सोडून क्रान्तीने स्वातंत्र्यदेविचे घुमविणार प्राकार ॥५॥

टाकिन भंगुनि रिपुसिंहासन धूलिमलिन ध्वज उंच उभारिन
हिंदुयशाचा डंका घुमविन काय कमी रायरेश्वरा तव असल्यावर आधार ॥६॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### शैक्षणिक क्षेत्रभेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाणीशुद्धीकरण प्रक्रियेची दिली माहिती : मराठवाडा हायस्कूलचा उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी-** नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा प्राथमिक शाळेमार्फत शनिवार २८ नोव्हेंबर रोजी रामकृष्ण नगरातील गुरुकृपा वॉटर प्लांट येथे शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना पाणी शुद्धीकरण प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांना प्लांटमधील विविध यंत्रणांची पाहणी करून शुद्ध व अशुद्ध पाण्यातील फरक, पाणी जीवनातील महत्त्व तसेच पाणी वाचवा - जीवन वाचवा हा संदेश प्रभावीपणे समजावून सांगण्यात आला. तज्ज्ञांनी अशुद्ध पाण्यामुळे होणारे रोग आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देत स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक समृद्ध झाले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सौ. स्मिता ढगे, क्षेत्रभेट प्रमुख लक्ष्मण कावळे, श्रीपाद पार्डीकर यांचे विशेष सहकार्य लाभले. या ज्ञानवर्धक अनुभवानं विद्यार्थ्यांचा शिकण्याचा दिवस अधिक आनंददायक आणि स्मरणीय ठरला.

### सेलूतील तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नूतन विद्यालयाचे यश

**परभणी,/प्रतिनिधी-** पंचायत समिती शिक्षण विभाग सेलू आणि विवेकानंद प्राथमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २८ नोव्हेंबर रोजी आयोजित ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले.

माध्यमिक गटातून विद्यार्थिनी दुर्गा नामदेव मगर, श्रीराम सतीश खिस्ते आणि साहिल कळसकर यांनी सादर केलेल्या विज्ञान प्रयोगाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तर प्राथमिक गटातील शैक्षणिक साहित्य विभागात शिक्षक उमेश क्षीरसागर यांनीही प्रथम पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांना आदिती आंबेकर, अश्विनी पटाईत आणि विज्ञान विभाग प्रमुख सुनीता दहिफळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कलाशिक्षक आर. डी. कटारे, एफ. के. गावित, केशव डहाळे आणि गोविंद रामपूरकर यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य मिळाले.

यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार २९ नोव्हेंबर रोजी शाळेच्या वतीने करण्यात आला. या प्रसंगी मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक के. के. देशपांडे, शंकर बोधनापोड, रोहिदास मोगल, कुशल कडे, प्रशांत नाईक आणि सौ. शेटे आदींची उपस्थिती होती.

### ताडकळस जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मारोती कदम यांची 'बालभारती'च्या समीक्षण समितीवर निवड

**परभणी,/प्रतिनिधी-** ताडकळस जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व साहित्यिक मारोती भुजंगराव कदम यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांच्या समीक्षण सत्रासाठी निवड झाली आहे, अशी माहिती बालभारतीचे विशेषाधिकारी डॉ. संदीप निकम यांनी दिली.

शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२५ अंतर्गत इयत्ता ४ वीच्या ''आपल्या सभोवतालचे जग - भाग १'' या पुस्तकाच्या निर्मितीचे काम बालभारतीने सुरू केले आहे. शास्त्र व भूगोल विषय समितीने पुस्तकाची मसुदा प्रत तयार केली असून ती अंतिम करण्यासाठी स्थापित समीक्षण समितीमध्ये कदम यांची निवड करण्यात आली आहे.

कदम यांच्या निवडीबद्दल बालभारती सदस्य वैजनाथ काळे, डायटचे प्राचार्य डॉ. सुदर्शन चिटकुलवार, माजी प्राचार्य डॉ. प्रल्हाद खुणे, गणेश शिंदे, प्रज्ञा रोडे, गटशिक्षणाधिकारी बालाजी कापसीकर, शिक्षक संघाचे राज्य कार्याध्यक्ष किशनराव इदगे, पत्रकार जगदीश जोगदंड, सुरेश मगरे, चेअरमन विठ्ठल भोसले, विष्णू गव्हाणे, केंद्रप्रमुख राम जाधव, सुंदर धवन, तानाजी बिरादार, शामसुंदर मोकमोड, उमाकांत देशटवार, विठ्ठल रिठे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कुंडलिक सोनकांबळे, डॉ. दिलीप श्रृंगारपुतळे, डॉ. अमोल देशपांडे, डॉ. संतोष सेलूकर, अनिल ढाले, रविंद्र हनुमंते, व्यंकटरमण जाधव, रावसाहेब उगले, मारुती डोईफोडे, संतोष रत्नपारखी, रामदास खोकले आदींनी अभिनंदन केले आहे.

### फरकंडा येथील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी

**पालम,/प्रतिनिधी-** पालम तालुक्यातील फरकंडा येथील बॅक वॉटर खालील उर्वरित शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसानभरपाईचा मोबदला तात्काळ द्यावा, अशी मागणी शेतकरी प्रसाद पौळ आणि लोकश्रेय मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सलीम इनामदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

मौजे फरकंडा येथील डिग्रस बंधारा विष्णूपुरी प्रकल्प भाग-२ या बुडीत क्षेत्रामध्ये जमीनी गेल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना अद्यापही उर्वरित जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. या कारणामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्या आहे, त्यामुळे उर्वरित शेतजमीनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावा, अन्यथा २६ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही पौळ व इनामदार यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.
संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
१.**गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.
**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**
९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पूर्णेत नगराध्यक्ष पदासाठी विविध पक्षाचे बारा तर अपक्ष दोन उमेदवार रिंगणात

## जिल्हयातील सात नगरपालिका उमेदवारांचा आज होणार मतदान

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण १२ पक्ष २ अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्यामुळे पूर्णा नगरपालिका नगराध्यक्ष चे निवडणूक ही अत्यंत चुरशीची आणि बहुरंगी अटीतटीची होणार आहे.

पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू असून पूर्णा नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे नगराध्यक्ष पदाच्या निवडणूक साठी एकूण १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यामध्ये वेगवेगळ्या पक्षाचे १२ उमेदवारासह २ अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्यामुळे हे निवडणूक अत्यंत रंगतदार अटीतटीची होणार आहे. या निवडणुकीसाठी अध्यक्षपदासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून कडून प्रेमला संतोष एकलारे, पूर्णा शहर विकास आघाडी तथा यशवंत सेनेच्या वतीने विमलबाई लक्ष्मणराव कदम,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने शेख हसीना बेगम लतीफ शेख ,शिवसेने शिंदेच्या वतीने कमलबाई जनार्दन आप्पा कापसे,ऑल इंडिया मजलिस इत्तेहदूल मुस्लिमीन च्या वतीने शिरीन बेगम मोहम्मद शफीक,ऑल इंडिया मजलीस -ए -इन्कलाब- ए- मिलत या पक्षाच्या वतीने शेख परविन बेगम हबीब, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सुलतानाबी शेख कादर, वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आम्रपाली केशव जोंधळे, स्वराज्य शक्ती सेनेच्या वतीने तसनीम सुलताना शेख अहमद , आम आदमी पार्टीच्या वतीने शेख जारा आम्बरीन शेख हुसेन ,बहुजन समाज पार्टीच्या वतीने पुष्पाबाई बापूराव सूर्यतळ ,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाच्या वतीने राणी अविनाश कापुरे हे बारा पक्षाचे उमेदवार तर अपक्ष म्हणून उज्वला अनिल कांबळे व दीक्षा अरुण गायकवाड असे १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्यामुळे ही अध्यक्षपदाची निवडणूक अत्यंत चुरशीची व बहुरंगी होणार आहे तसेच २३ नगरसेवकाच्या निवडणुकीसाठी एकूण ११२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्यामुळे विविध प्रभागात सुद्धा बहुरंगी व तिरंगी लढत होणार आहे. त्यामुळे शहरात राजकीय वातावरण तापले असून प्रचाराला आता वेग आला आहे.

# धारासूर येथील शेतकऱ्यास पोलिस हवालदाराची मारहाण

### शेतकरी जाधव यांची पोलिस उपमहानिरीक्षकांना निवेदनाव्दारे मागणी

**विशेष प्रतिनिधी**

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** दोन भावातील आर्थिक कारणावरुन झालेला वाद सोनपेठ पोलिस ठाण्यात गेल्यानंतर पोलिस हवालदार मनोज राठोड यांनी पैशाची मागणी करत बेदम मारहाण केल्याची तक्रार धारासूर येथील शेतकरी हरिभाऊ मधूकर जाधव यांनी पोलिस उपमहानिरीक्षक यांच्याकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, धारासूर येथील हरिभाऊ जाधव व त्यांचे चुलत भाऊ भागवत जाधव यांच्यात दुधाच्या पैशावरुन १० नोव्हेंबर रोजी वाद झाला होता. भागवत जाधव यांनी तक्रार दिल्याने हरिभाऊ जाधव यांच्याविरुध्द सोनपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र नंतर दोघा भावातील हा वाद सामोपचाराने मिटला. तसे पोलिस ठाण्यात जाऊन सुध्दा कळवले. तरीही हवालदार मनोज राठोड यांनी तुम्हाला जामिन करुन घ्यावा लागेल असे सांगून हरिभाऊ जाधव यांच्याकडे १० हजार रुपयांची मागणी केल्याचे निवेदनात नमुद केले.मात्र एवढी रक्कम नसल्याचे सांगितल्यानंतर राठोड यांनी हरिभाऊ जाधव यांना ठाण्यात बसवून घेतले. वारंवार पैशाची मागणी करुन एका रुममध्ये नेऊन कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसतांना मनोज राठोड यांनी बेदम मारहाण केल्याचा आरोप निवेदनात केला आहे.

सदर प्रकरणी सोनपेठ पोलिस ठाण्यातील सीसीटीव्ही पुटेज पाहून या प्रकरणी सखोल चौकशी करावी व सबंधित कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी हरिभाऊ जाधव यांनी निवेदनात केली.

## घरफोडी प्रकरणातील संशयित आरोपी पकडला

### पोलिसांच्या तत्पर कारवाईने समाधान

**जिंतूर,/प्रतिनिधी-** शहरात घडलेल्या घरफोडी प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश मिळाले. पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील संशयिताला पोलिसांनी जेरबंद केले असून त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमालही ताब्यात घेण्यात आला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, रात्रगस्ती दरम्यान उचललेल्या संशयितावर चौकशीतूनच या प्रकरणाचा धागा सापडला.



दि. २७ नोव्हेंबर रोजी रात्री गस्त घालत असताना पोलिसांना एकनाथ महादु मुंढे (वय ४५, रा.शेवडी, ता. जिंतुर) हा व्यक्ती संशयास्पद परिस्थितीत फिरताना आढळला. पथकाने शिताफीने त्याला ताब्यात घेतले व त्याच्यावर कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई दरम्यान पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्याने येथील पोलिस स्टेशन हद्दीत घरफोडी केल्याची कबुली दिल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तपास जलद गतीने पुढे नेला व चोरीस गेलेला मुद्देमाल संशयिताकडून हस्तगत केला. तपास पथकाने दिलेल्या माहितीनुसार, घरफोडीतील चोरट्याचा शोध लागणे कठीण असताना रात्रगस्तीत संशयास्पद हालचालींवर आधारित केलेल्या चौकशीतून या गुन्ह्याचा उलगडा झाला. पुढील तपासांतून आणखी माहिती मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुंजाळ, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी जिवन बेनीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास व कारवाई पोनि.गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वाखाली केली असून पथकात पोह. शिराळकर, पोह. पठाण, पोह. गुंगाणे, पोशि. कांबळे, पोशि. पांचाळ यांचा समावेश होता. शहरातील घरफोडी प्रकरणाचा छडा लावल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

## पेंडू येथील संताच्या भूमीत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**पालम,/प्रतिनिधी-** पालम तालुक्यातील संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेंडू नगरीत आज पासून श्री संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वर पारायण सोहळ्याचे आयोजन दि२५/११ पासून करण्यात आले आहे .

या ठिकाणी भाविक भक्त मोठ्या प्रमाणात बाहेर गावाहून दर्शनासाठी येत असतात या पेंडू नगरीला मिनी पंढरपूर असेही ओळखले जाते दरवर्षीप्रमाणे याही वर्षी या ठिकाणी यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे त्यात दि. २५ /११ रोजी श्री ह भ प रमेश महाराज पेंडुकर दि. २६/ ११ रोजी श्री ह भ प माधव महाराज घागरदरा दिनांक २७ रोजी श्री ह भ प सुभाष महाराज सादलापूरकर दिनांक २८ रोजी श्री ह भ प मंचक महाराज पारवेकर दिनांक २९ रोजी श्री ह भ प विठ्ठल महाराज बाबुळगावकर दिनांक ३० रोजी श्री ह भ प अच्युत महाराज किरडे दिनांक १/१२ रोजी तुकोबाराया गाथा पूजन श्री ह भ प माधव महाराज दि. २ /१२ रोजी सकाळी ९ ते ११ श्री ह भ प भागवताचार्य केशव महाराज पालमकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे व दिनांक १/१२ रोजी संध्याकाळी भव्य दिव्य अशी रथातून संतांच्या पालखीचे आयोजन करण्यात आले आहे तसेच या यात्रेच्या निमित्ताने क्रिकेटचे सामने ही सुरू करण्यात आले आहेत व पशुप्रदूषण दिनांक २ /१२ रोजी सकाळी होईल व शेवटी कुस्तीची दंगल दिनांक ३/१२ रोजी होणार आहे असा हा सात दिवसाचा सप्ताहाचा कार्यक्रम या पेंडून नगरीत टाळ मृदंगाच्या तालात व उत्साहाने साजरा केला जातो या यात्रेसाठी ग्रामस्थ व यात्रा कमिटी या यात्रेची देखभाल मोठ्या प्रमाणात करत असतात या यात्रेस परिसरातील भाविक भक्तांची उपस्थिती राहावे असे आव्हान श्री संत पेंडु येथील नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे या पेंडू येथे जाण्यासाठी पालम वरून खाजगी वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.




## विभागीय क्रिकेट स्पर्धेत प्रिन्सचा तृतीय क्रमांक



**सेलू,/प्रतिनिधी-** क्रीडा व युवक सेवा संचनालाय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी आणि एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल सेलू आयोजित विभागीय क्रिकेट स्पर्धेत एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूलने घवघवीत यश मिळवले आहे.

दि.२८ नोव्हेंबर रोजी नूतन महाविद्यालय सेलूच्या मैदानावर संपन्न झालेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूलच्या १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला तसेच यश मगर आणि कोमल पौळ या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय निवड चाचणी साठी निवड झाली या खेळाडूंना प्रमोद गायकवाड,कपिल ठाकूर,सुरज शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती सेलूचे डॉ. संजय रोडगे, संचालक अँड . दत्तराव कदम, धोंडगे साहेब, श्री. लोकुलवार अण्णा, प्रशांत नाईक, सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्रिंसिपल प्रा . कार्तिक रत्नाला, प्रगती क्षिरसागर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## हिंदू कोड बिल हे महिलांच्या संरक्षणाचे भक्कम कवच : डॉ. अनंत राऊत

**महेश दिशागत**

**मानवत,/प्रतिनिधी-** के. के. एम .महाविद्यालय,राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संविधान जनजागर अभियान पार पडले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे यांनी संविधानाची सामाजिक न्यायाची परंपरा विद्यार्थ्यांना भावनिक शब्दांत समजावली.

महाविद्यालयाच्या प्रांगणात मुलींनी साकारलेल्या आकर्षक रांगोळ्यांनी वातावरणाला उत्सवी रंग चढवला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अनंत राऊत यांनी ''हिंदू कोड बिल हे महिलांच्या संरक्षणाचे भक्कम कवच आहे'' या विषयावर अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी भारतीय संविधानातील समता, न्याय आणि महिलांच्या अधिकारांचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. विजयकुमार कत्रुवार, उपप्राचार्य डॉ. किशोर हुगे पर्यवेक्षक प्रा. अनिल कापसे उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुनीता कुकडे यांनी करून दिला तर सूत्रसंचालन डॉ. सारीका सावंत यांनी केले कार्यक्रमाची सुरुवात संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. गौरी जोशी, मालीनी गायकवाड व राहत सय्यद यांच्या सुमध आहे.




## ऊसाला किफायतशीर भाव मिळण्यासाठी सोनपेठात शेतकरी आक्रमक

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** ऊसाला प्रती टन तीन हजार रुपये पहिली उचल मिळावी यासाठी ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाले असून शनिवारी तालुक्यातील शेतकऱ्यांनी खडका व सायखेडा पाटीवर टायर जाळुन ऊस तोड व वाहतुक बंद करण्याचा ईशारा दिला आहे. बीड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाच्या पहिल्या उचली साठी सुरु केलेल्या आंदोलनाचे लोन आता सोनपेठ तालुक्यात पसरु लागले आहे.

सोनपेठ तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन एक बैठक घेतली. ऊसाला पहिली उचल तीन हजार रुपये मिळावी या साठी निर्धार केला व सोनपेठ तालुक्यातील खडका येथील व्टेन्टीवन शुगर या करखान्यावर दि. १ डिसेंबर सोमवार रोजी तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. त्या साठी तालुक्यातील ऊस उत्पादक गावोगावी बैठका घेत असुन उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केल्या जात आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दि २९ रोजी सायखेडा कारखान्याच्या दोन्ही बाजुला खडका व सायखेडा पाटीवर टायर जाळुन तालुक्यातील ऊस तोड व वाहतुक बंद करण्याचा ईशारा ऊस उत्पादक आंदोलकांनी दिला आहे. या आंदोलनास परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती होती.



गंगाखेड येथील नगर परिषदेच्या प्रचार सभेसाठी आलेल्या सायखेडा येथील २१ शुगरचे सर्वेसर्वा अमित देशमुख यांच्या प्रचार सभेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस दरा बाबत विचारणा केली . यावेळी गंगाखेड पोलीसांनी विचारणा करणाऱ्या रामेश्वर मोकाशे, सुरेश ईखे व ओकांर पवार यांना ताब्यात घेतले. सोनपेठ तालुक्यातील व परिसरातील साखर कारखान्यांनी ऊस दर जाहीर न केल्यास हे आंदोलन तिव्र करणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या बीडमधील सभेने जिल्ह्यात कमळ फुलणार
## ना.पंकजा मुंडे यांचे लक्ष्य व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचे योग्य नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० नोव्हेंबर**

मी मुख्यमंत्री असताना बीडच्या विकासासाठी कधीही भेदभाव केला नाही.स्व.गोपीनाथ मुंडे यांचा जिल्हा असल्याने बीडसाठी नेहमीच विशेष तरतूद केली. आता पुन्हा एकदा कमळाला मतदान करा, बीडच्या विकासासाठी कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बीड नगरपरिषद निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने सोमवारी (दि.१) आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. मतदानाच्या आदल्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या सभेमुळे शहरात भाजपमय वातावरण झाले असून भाजपने प्रचंड शक्तीप्रदर्शन केले. ही सभा भाजपच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी ठरली.

व्यासपीठावर भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांच्यासह आ.सुरेश धस, माजी मंत्री बदामराव पंडित, केशवराव आंधळे, बाळराजे पवार, आदित्य सारडा, राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी, डॉ.योगेश क्षीरसागर, सलीम जहांगीर, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ड.सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे, गेवराईच्या उमेदवार गीताभाभी पवार, माजलगावच्या उमेदवार डॉ. संध्या मेंडके, धारूरचे उमेदवार रामचंद्र निर्मळ यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, डॉ.ज्योती घुंबरे नगराध्यक्ष झाल्यानंतर बीडसाठी अतिरिक्त पाणीपुरवठा योजना राबवली जाईल. प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवण्याचे नियोजन करण्यात येईल. नगरपरिषदेच्या हद्दवाढ भागासाठी स्वतंत्र निधी दिला जाईल. डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ. ज्योती घुंबरे यांच्या नेतृत्वाखाली सर्व बेघर नागरिकांसाठी घरकुल योजनेचा मोठा प्रकल्प हाती घेतला जाईल. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य सरकारने सर्वसामान्यांच्या हिताच्या असंख्य योजना राबवून कोट्यवधी रुपये खर्च केले. या योजना घराघरात पोहोचवल्या. 'लाडकी बहीण' योजना सरकार असेपर्यंत सुरुच राहील. पुढील टप्प्यात महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचा कार्यक्रम राबवण्यात येणार असून पुढील वर्षात हजारो महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्या जातील. डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बचत गटांसाठी मॉल उभारण्यात येणार आहे.




डॉ.ज्योती घुंबरे या उच्चशिक्षित असून त्यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषदेचा कायापालट होईल. नरेंद्र मोदी यांचे विकासाचे व्हिजन थेट बीडमध्ये राबवण्यासाठी भाजपला संधी द्या. मतदानाच्या दिवशी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. यावेळी लाडक्या बहिणीसह नागरिकांची मोठ्या संख्येने गर्दी होती. या सभेचे यशस्वी नियोजन उद्योजक गौतम कांबळे यांच्या 'विजया इव्हेंट' कंपनीने केले होते. दरम्यान, सभेला येण्यासाठी प्रत्येक प्रभागातील नागरिक उत्सुक दिसून आले, बीड शहराच्या विविध भागातून नागरिक रॅली काढून घोषणाबाजी करत सभास्थळी दाखल झाले.

### कार्यकर्त्याच्या घोषणेला दाद देत देवेंद्र फडणवीस यांचा 'जय श्रीराम'चा नारा

बीड नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या सभेत भाजप कार्यकर्ते व समर्थकांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला होता. यावेळी एका कार्यकर्त्याने दिलेल्या घोषणेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनीही भाषण सुरू असतानाच 'जय श्रीराम'चा नारा दिला. सभास्थळी उपस्थितांनी या क्षणाला जोरदार दाद दिली.

**बीड भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी ना.पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरामध्ये नगर परिषद निवडणुकीचे सुयोग्य नियोजन करून सर्व कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करून सर्व मतदारांपर्यंत जाण्याचे कसब जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी चोख पार पाडले. त्यांच्या नियोजनामुळे कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीचे गांभीर्य लक्षात आल्याने मतदारांपासून बुथपर्यंतचे नियोजन केल्याने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बीडमधील झालेल्या सभेने त्यांनी दिलेला जनतेला विश्वास यामुळे जिल्ह्यातील नगर परिषदांचे अध्यक्ष बहुतांश भाजपाचे होतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.या सभेमध्ये दुरदर्शी दृष्टे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचे नियोजन लक्ष्यात घेऊन जवळ बोलावून कानात त्यांच्या काय सांगितले हाच विषय सभास्थळी चर्चीला गेला.**

# न.प.च्या अध्यक्षसह २६ उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंदिस्त

४० हजार ८८१ मतदार बजावणार मतदानाचा हक्क
प्रशासनाची जय्यत तयारी
मतदान केंद्राध्यक्ष, पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० नोव्हेंबर**

माजलगाव नगरपालिकेच्या अध्यक्षासह १३ प्रभागासाठी २६ उमेदवारासाठी होऊ घातलेल्या निवडणूकीची मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडुन जय्यत तयारी करण्यात आली असून ४० हजार ८८१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. याकामी मतदान केंद्राध्यक्ष, बंदोबस्तासाठी पोलिस कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माजलगाव नगरपालिकेचे अध्यक्षपद ओबीसी महिला राखीव असून निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मेहरूबी खलील पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या शिफा बिलाला चाऊस, भाजपाच्या संध्या मेंढके,उबाठा सोनाली पैंजने या चार उमेदवारात अध्यक्ष पदासाठी लढत होत असून १३ प्रभागासाठी २६ जागेसाठी विविध पक्षाचे १४७ उमेदवार मैदानात आहेत.

राजकीय दृष्ट्या महत्वपुर्ण असलेली माजलगाव नगरपालिका ताब्यात घेण्यासाठी नेते मंडळींनी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. त्यामुळे निवडणुक अटीतटीची होत असुन आरोप - प्रत्यारोपांच्या फै-या देखिल झाडल्या जात आहेत. माजलगाव न. प. निवडणुकीत ४० हजार ८८१ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असुन प्रशासनाकडुन निवडणुक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडावी यासाठी केंद्राध्यक्ष, टक्केवारीसाठी विशेष टिम, ऑपरेटर आणि पोलिस कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदारांची संख्या

एकुण मतदार - ४० हजार ८८१.

पुरूष मतदार - २० हजार ७२६.

महिला मतदार - २० हजार १५४.

मतदान केंद्र - ४५.

कर्मचारी संख्या

पोलिस कर्मचारी - ६०.

मतदान केंद्राध्यक्ष - ४५.

मतदान अधिकारी - १८०.

एकुण कर्मचारी - २२५.

झोनल अधिकारी - ०८.

राखीव टीम - ०५.

टक्केवारी घेण्यासाठी कर्मचारी - २१.

दुबार मतदारांचे हमीपत्र घेणार - एसडीएम इंगोले

शहरातील एका वार्डात दुबार मतदार असल्याची माहिती असुन त्यांनी दुबार मतदान करू नये यासाठी त्यांचेकडुन हमीपत्र लिहुन घेण्यात येणार आहे. तरी देखिल त्यांनी दुबार मतदान करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचेवर कारवाई करण्यात येईल. - गौरव इंगोले, निवडणूक निर्णय अधिकारी

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे नगरसेवक पदाचे प्रभाग क्रमांक ५ अ ओबीसी महिला उमेदवार टाक सोनाली भारत व ब सर्वसाधारण पुरुष सतीश बाळासाहेब देशमुख यांच्या प्रचाराने वार्ड दणाणून गेला

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० नोव्हेंबर**



शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील गणेश पार, काळरात्री परिसर प्रभागामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नगरसेवक पदाचे प्रभाग क्रमांक ५ अ ओबीसी महिला उमेदवार टाक सोनाली भारत व ब सर्वसाधारण पुरुष सतीश बाळासाहेब देशमुख यांच्या प्रचाराने वार्ड दणाणून गेला. वार्ड क्रमांक पाच मध्ये वातावरण तुतारीमय झाले होते. या प्रचार रॅलीस व संवाद दौऱ्यास प्रभागातील मतदार नागरिकांनी उस्फूर्तपणे टाक सोनाली भारत व देशमुख सतीश बाळासाहेब प्रतिसाद दिला. वॉर्डातील प्रचाराचा झंजावात पाहून , विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. या प्रभागामधून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ . संध्या ताई दीपक देशमुख व नगरसेवक पदाचे उमेदवार टाक सोनाली भारत व देशमुख सतीश बाळासाहेब यांनी प्रभाग पिंजून काढत तसेच रॅली काढून मतदारांचे वार्डाच्या विकासाबाबत संवाद साधला. या संवादात मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मतदारांचा स्वतःहून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिसल्याने वातावरण ढवळून निघाले आहे. सगळीकडे तुतारीमय वातावरण झाले असून विजय निश्चित असल्याचे दिसले.यावेळी या प्रचार रॅलीस अमर रोडे , शरणम् आदोडे, सुशील घाडगे ,तत्वशील घोडके,

रवींद्र कसबे ,धनराज जगतकर

पंकज सावंत ,सुशील समुद्रे

रोहित वाघमारे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे कार्यकर्ते पदाधिकारी व मतदार मोठ्या संख्येने रॅलीस उपस्थित होते.

# विकासाला मत द्या; परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीत महायुतीच्या मागे आपली प्रचंड ताकद उभी करा!

विनोद सामत, विजयकुमार वाकेकर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० नोव्हेंबर**

ना. पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली परळी शहराचा सर्वांगीण विकास निश्चितच होणार आहे. यासाठी शहराची मध्यवर्ती संस्था असलेल्या नगर परिषदेमध्ये महायुतीला प्रचंड ताकतीने सत्ता देणे अत्यंत आवश्यक आहे. परळीचा शाश्वत व सर्वांगीण विकास करण्यासाठी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह महायुतीच्या सर्व प्रभागातील उमेदवारांच्या मागे आपली प्रचंड ताकद उभी करा असे आवाहन वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेचे चेअरमन विनोद सामत तसेच संचालक तथा भाजपनेते विजयकुमार वाकेकर यांनी केले आहे.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीत आपल्या परळीचे दोन बलाढ्य, दिग्गज, दूरदर्शी नेते ना.पंकजाताई मुंडेआणि आ.धनंजय मुंडे ही महायुतीची खंबीर शक्ती आज आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. येणाऱ्या काळात परळीत सुशासन, पारदर्शकता आणि परळीच्या प्रगतीसाठी आणि परळीच्या विकासाची गती वाढवण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा.महायुतीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह सर्व प्रभागातील उमेदवारांच्या घड्याळ, कमळ व धनुष्यबाण या चिन्हांसमोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्य देऊन विजयी करावे असे आवाहन वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेचे चेअरमन विनोद सामत तसेच संचालक तथा भाजपनेते विजयकुमार वाकेकर यांनी केले आहे.

# परळीकरांनो निस्वार्थ पणे सेवा करण्यासाठी नगराध्यक्ष पदाची संधी द्या-मैनुमा बेगम सय्यद हनीफ

हाताचा पंजा आणि कपबशी चिन्हावरच मतदान करा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० नोव्हेंबर**



कोणतीही अपेक्षा न ठेवता निर्भय आणि स्वच्छ परळी ,सुंदर परळी निर्माण करण्याकरिता, निस्वार्थपणे परळीची सेवा करण्यासाठी नगराध्यक्ष पदाची संधी द्या असे आवाहन काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांनी केले आहे.

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांनी पुढे म्हटले की, आजपर्यंत परळीची जनतेने ज्यांना संधी दिली त्यांनी परळीचे वाटोळे केले आहे.परळी शहर शैक्षणिक दृष्ट्या इतर तालुक्यपेक्षा मागे आहे.शहरातील नागरिकांचे प्रश्न जशाला तसे आहेत.नगर पालिकेत फक्त गुत्तेदार पोसण्याचे काम झाले.याच गुत्तेदारांच्या माध्यमातून आलेल्या करोडो रुपयांचा निधी विकासावर खर्च न करता भ्रष्टाचार करून, बोगस बीले उचलून लाटण्याचे काम मात्र सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस यांनी प्रामाणिकपणे केले आहे.

नगर पालिकेला गुत्तेदारमुक्त करण्यासाठी शहरातील तमाम मतदार बंधू ,भगिनी यांनी हाताचा पंजा आणि कपबशी चिनहावरच आपले अमुल्य मतदान करून कांग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे असे आवाहनही मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांनी केले आहे.

# गेवराईकरांनो अमरसिंह पंडितांचे पाताळयंत्री राजकारण हाणून पाडा

आम्हाला एकटे पडू देऊ नका ; बाळराजे पवारांची मतदारांना भावनिक साद

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० नोव्हेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीचा तापलेला माहोल शिगेला पोहोचत असताना भाजप नेते बाळराजे पवार यांनी मतदारांच्या मनाला चटका लावणारे भावनिक आवाहन करून वातावरणाला कलाटणी दिली आहे. मी आणि बदाम आबा जनतेच्या लोकन्यायालयात उभे आहोत. आम्ही कुणाशी वैर करायला आलो नाही. पण विरोधक मात्र सुडाने पेटलेत. आम्हाला संपवण्याच्या भाषा करू लागलेत. आमच्या राजकीय अस्तित्वापेक्षा गेवराईचा गावगाडा अबाधित राहावा, हेच आमचे प्रामाणिक ध्येय आहे. म्हणूनच अमरसिंह पंडित यांचे पाताळयंत्री राजकारणाचा डाव हणून पाडा व आम्हाला एकटे पडू देऊ नका, आमच्या पाठिशी खंबीरपणे उभे रहा असे भावनिक आवाहन बाळराजे पवार यांनी केले आहे.

नगरपरिषद निवडणुकीत एकीकडे माजी मंत्री बदामराव पंडित आणि भाजप नेते बाळराजे पवार तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित असा थेट सामना आहे. या तुफानी लढाईत प्रचंड तणाव, आरोप-प्रत्यारोपांची धुरळा उडत असताना बाळराजे पवार यांनी पहिल्यांदाच एवढ्या भावनिक शब्दांत मतदारांना साद घातली.

ते पुढे म्हणाले, गेवराईचा विकास हा आमच्यासाठी राजकारणाचा विषय नाही, तर घराचे व्रत आहे. तसेच आम्ही गेली अनेक वर्षे एकही प्रभाग विकासाशिवाय ठेवला नाही. पण आज विरोधक काळोख्या पाताळयंत्री राजकारणाचा आधार घेऊन आमच्यावरच नाही तर गेवराईच्या भविष्यावरच घाव घालण्याचा प्रयत्न करत आहेत. मतदारांनो तुम्हीच या शहराचे धनी आहात, अन आम्हाला तुमच्याच आशीर्वादाची गरज आहे.

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रचारासाठी शहरातील सभांमध्ये आणि घराघरच्या संपर्कात उमटणारा प्रतिसाद पाहता लोकभावना भाजपाच्या बाजूने झुकत असल्याची चर्चा सगळीकडे रंगली आहे. गीताभाभी यांच्या प्रामाणिक प्रतिमेचा आणि पवार कुटुंबाने केलेल्या कामांचा प्रभाव सर्वत्र जाणवत असून युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांकडून मिळणारा उत्स्फूर्त पाठिंबा स्पष्टपणे जाणवत आहे.

सभेत अनेक ठिकाणी नागरिकांनी बाळराजे पवारांचे बोलणे ऐकतानाच भावूक प्रतिक्रिया दिल्या. काही ज्येष्ठ मतदारांनी तुम्ही एकटे पडणार नाही. या पार्श्वभूमीवर बाळराजे पवारांनी घेतलेली भावनिक भूमिका, विरोधकांच्या राजकारणावर केलेली तीव्र टीका आणि मतदारांच्या विश्वासाला केलेले स्पर्श करणारे आवाहन या सर्व गोष्टींमुळे निवडणुकीत नवा कल निर्माण झाला असून गेवराईकरांचा निश्चय 'विकासाकडे, स्थैर्याकडे आणि पवार-कुटुंबाच्या नेतृत्वाकडे' अधिक दृढ होत चालल्याचे चित्र दिसत आहे.

# कै. दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात गीता जयंती उत्साहात साजरी करण्यात आली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० नोव्हेंबर**

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन, दीप प्रज्वलन व भगवद्गीता ग्रंथाच्या पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारत देश महान हे सांघिक गीत घेण्यात आले.

या कार्यक्रमाला श्री वेंकटेशजी गोसावी (अध्यक्ष, स्था. व्य. स ), श्री केदारजी मंत्री (कार्यवाह, स्था. व्य. स), गीताव्रती सौ. निर्मलाताई उपाध्ये, श्री संतोषजी जीगे (तालुकाध्यक्ष मराठी पत्रकार संघ), डॉ. राजेंद्रजी भाला (सदस्य ,स्था. व्य. स.), श्री तुकारामजी तौर ( सदस्य ,स्था.व्य. स) , प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जी जोशी, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सुधाकर जी घायतडक यांची उपस्थिती होती.

# श्रीमद भगवतगीता म्हणजे उत्तम पुरुष बनण्याचा मार्ग-डॉ. महेश देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० नोव्हेंबर**

श्रीमद भगवतगीता म्हणजे उत्तम पुरुष बनण्याचा मार्ग तसेच भगवदगीता म्हणजे जीवन जगण्याचे शास्त्र आहे. गीतेतुन आपण शाश्वत मूल्य शिकू शकतो असे प्रतिपादन ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. महेश देशमुख यांनी गीता जयंती निमित्त सिद्धेश्वर महाविद्यालयात संस्कृत विभागामार्फत आयोजित व्याख्यानात केले.

व्यासपीठावर प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. देशमुख म्हणाले कि, स्वतःचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी, उत्तम पुरुष होण्यासाठी गीतेच्या १५ व्या अध्यायाचे पठण अवश्य करावे. सृष्टीमध्ये असणारे चैतन्य म्हणजे ईश्वर होय. फक्त गीता जयंतीच का साजरी केली जाते. कारण यातील तत्त्वज्ञान हे त्रिकालबाधित व शाश्वत असे आहे. आपल्या उद्दिष्ट पर्यंत जाण्यासाठी लागणारा मार्ग म्हणजे शास्त्र होय. राजोगुण, तमोगुण व सत्वगुण यातून सृष्टीची निर्मिती झाली आहे. सृष्टीचे हे चक्र अखंडपणे सुरू राहणार आहे. संघ दोषावर आपण विजय मिळवला पाहिजे. दुसऱ्यातील दोष आपल्यात येता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे. अध्यात्माकडे जाणे म्हणजे कामनांची निवृत्ती होय. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, भारतीय संस्कृती व हिंदू धर्माचा आद्यग्रंथ भगवदगीता असून त्यातून आयुष्याला योग्य दिशा देण्याचे काम गीता करते. तसेच माणसाने कसे कर्म करावे याचे ज्ञान गीता शिकवते. सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. प्रास्ताविक प्रा. राघवेंद्र मुळे यांनी केले तर आभार प्रा. राजाराम जाधव यांनी मानले. या प्रसंगी गीतेच्या १५ व्या अध्यायाचे पठण प्रा. सुरेशचंद्र नेळगे व विद्यार्थ्यांनी सामूहिकरीत्या केले. या प्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# शहराचा विकासथ कायम ठेवण्यासाठी सौ.गीताभाभींसह भाजपच्या सर्वच उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करा – सौ.रत्नमाला नानी मोटे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० नोव्हेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीचा रणसंग्राम निर्णायक टप्प्यात असताना, शहराच्या विकासयात्रेला नवा वेग देण्यासाठी भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांना आणि सर्वच प्रभागातील भाजप उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे प्रभावी आवाहन भाजप महिला आघाडीच्या नेत्या रत्नमाला नानी मोटे यांनी मतदारांना केले आहे.

शहरात गेल्या काही वर्षांत झालेला भरीव विकास नव्या पाणीपुरवठा योजनेपासून ते आधुनिक सुविधा, स्वच्छता उपक्रम, रस्त्यांचे जाळे आणि महिलांसाठी राबविलेल्या विविध योजनांचा ठसा हा भाजपच्या नेतृत्वातील कारभाराचे प्रत्यक्ष उदाहरण असल्याचे त्या म्हणाल्या. हा विकास कोणाच्याही कृपेने नाही, तर पवार कुटुंबाच्या कष्टामुळे आणि जनतेच्या विश्वासामुळे झाला आहे.

भाजपकडून उमेदवारी जाहीर झाल्यापासूनच गीताभाभींच्या नावाला मिळणारा जयघोष, विशेषतः महिलांचा उस्फूर्त पाठिंबा आणि युवकांचा वाढता सहभाग पाहता, शहराने निवडणुकीपूर्वीच आपल्या पसंतीची दिशा स्पष्ट केल्याचे चित्र सर्वत्र आहे. विरोधकांनी निर्माण केलेला अपप्रचार, अफवा आणि दिशाभूल करणारी विधान यांना गेवराईकरांचा काडीमात्र प्रतिसाद नाही. उलट, पवार परिवाराचा विकास पाहिला आहे, काम अनुभवले आहे त्यामुळे शहरातील जनता ही पवार कुटुंबियांच्या पाठिशी आहे.

रत्नमाला नानी मोटे पुढे म्हणाल्या, गीताभाभी या महिलांच्या प्रत्येक प्रश्नाला धावून जाणाऱ्या, प्रत्येक घराशी जोडलेल्या आणि सभागृहात कामाचा मोठा अनुभव असलेल्या उमेदवार आहेत. शहरातील महिलांशी त्यांचे कौटुंबिक नाते असल्याने, त्यांचा विजय केवळ खात्रीचा नाही तर गेवराईच्या सुरक्षित भविष्यासाठी आवश्यक आहे. गीताभाभी म्हणजे बाळराजे दादांच्या विकासदृष्टिकोनाचा पुढचा टप्पा आणि महिलांच्या सशक्तीकरणाचा खंबीर आधारस्तंभ आहे.

म्हणून शहराच्या भौतिक विकासासाठी व महिलांच्या भविष्याला योग्य दिशा देण्यासाठी सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांच्यासह भाजपच्या सर्वच उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन भाजप महिला आघाडीच्या नेत्या सौ.रत्नमाला नानी मोटे यांनी केले आहे.

# निलंगा नगरपरिषद निवडणूक स्थगित

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १ डिसेंबर :** निलंगा नगरपालिका निवडणूक २०२५ साठी नगराध्यक्ष व सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या दोन जणांनी न्यायालयात अपील दाखल केले होते. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी आवश्यक ती मुदत न मिळाल्यामुळे निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशानुसार संपूर्ण निलंगा न.प ची निवडणूक प्रक्रिया स्थगित करून पुढे ढकलण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की , निलंगा नगरपरिषद निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अजित बंडोपंत शाहीर यांनी नगराध्यक्ष पदासाठी तसेच एका प्रभागात सदस्य पदासाठी व सुजित बंडोपंत शाहीर यांनी एका प्रभागात सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीत दोघांच्याही अर्जात त्रुटी असल्याचे सांगून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अजीत शाहीर व सुजित शाहीर यांचे उमेदवारी अर्ज अवैध केले होते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाविरुद्ध अजित शाहीर व सुजित शाहीर यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने अपिलावर दि २५ नोव्हेंबर निर्णय दिला. त्यामुळे अपिलार्थ्यांना आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आवश्यक ती मुदत न मिळाल्यामुळे निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबरच्या आदेशानुसार निलंगा नगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर च्या आदेशानुसार दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. त्यानुसार १० डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येईल व दिनांक २० डिसेंबर रोजी मतदान २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन मतदानाचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

### निलंगा नगर परिषदेची निवडणूक

निलंगा नगर परिषदेची निवडणूक स्थगित करण्यात आल्याच्या निषेधार्थ कॉंग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निलंगा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रास्ता रोको आंदोलन करून निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात घोषणाबाजी करून निदर्शने केली.

# तुम्ही साथ द्या, औसाचा कायापालट करू : मुख्यमंत्री

## व्हिडिओ संदेशातून मुख्यमंत्र्यांनी साधला औसा शहरातील मतदारांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १ डिसेंबर :** गेल्या २० वर्षापासून रखडलेल्या माकणी पाणी पुरवठा योजनेची मागणी तुम्ही माझ्याकडे केली होती. त्यावेळी आठ दिवसात मंजुरी देण्याचे आश्वासन दिले होते. आणि आठच दिवसात तुमची मागणी पुर्ण केली. त्याचप्रमाणे आजपर्यंत तुम्ही जे कांही मागितले. ते संपुर्ण दिले आहे. होवू घातलेल्या नगरपालिका निवडणुकीत तुम्ही दि. २ रोजी भाजपा-शिवसेना-रिपाईंच्या महायुतीला मतदारुपी साथ द्या.शहराचा सर्वांगिण विकासातून कायापालट करु असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशातून औसा शहरातील मतदारांशी थेट संवाद साधत दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, औसा शहराशी आपला जुना ऋणानुबंध आहे. असे सांगून त्यांनी गेल्या काही वर्षांत झालेल्या महत्त्वाच्या विकासकामांचा आढावा घेत मतदारांमध्ये यावेळी उत्साह निर्माण केला. औसा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा जपणारे शहर आहे. पंधरा-वीस दिवसांनी पाणी मिळणाऱ्या औशासाठी माकणी धरणाची योजना औसेकरांची २० वर्षांची लढाई होती. महा जनादेश यात्रेदरम्यान आमदार अभिमन्यू पवार यांनी समस्या



माझ्या निदर्शनास आणून दिली. त्याच सभेत मी आठ दिवसात योजनेला मंजुरी देण्याची घोषणा केली आणि आठ दिवसात ती प्रत्यक्षात दिली. २०२३-२४ मध्ये काम सुरू झाले आणि आज औशाला माकणी धरणाचे पाणी मिळू लागले आहे.याचसोबत अमृत योजनेतून औसा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४३ कोटी रुपये दिल्याची माहिती त्यांनी दिली. या योजनेचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, औसा शहरातील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार २०२० पासून सातत्याने पाठपुरावा करत होते.

पण तेव्हा सत्तेत असलेल्या नगरपालिकेने काम रोखले होते असा खुलासा करुन मुख्यमंत्री पुढे म्हणाले, २०२२ मध्ये आमची सत्ता आल्यानंतर १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला १०० कोटींची मंजूरी दिली. आणि तात्काळ निधी देऊन कामाला गती दिली. आज काम वेगाने सुरू आहे.

औशाच्या सर्वांगीण विकासासाठी ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी देऊन राज्य सरकारने मोठी कामगिरी केली आहे. शहरातील मुख्य रस्त्याच्या टप्पा ३ चे काम पूर्ण झाले असून ११ सार्वजनिक स्वच्छतागृहे, विश्रांतीगृहे, वरिष्ठ न्यायालयाची स्थापना तसेच दोन कोटी खर्चून आधुनिक बौद्ध विहाराची उभारणी झाली आहे. श्रीक्षेत्र गोपाळपूर देवस्थानातील भाविकांसाठी सुविधांसाठीही ५ कोटी रुपये दिले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

औसा शहराला ग्रामीण भागाशी आणि लातूर शहराशी जोडणाऱ्या सात रस्त्यांपैकी तीन रस्त्यांचे काम पूर्ण झालेआहे. उर्वरित चार रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. यासोबतच जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्या आमदारकीच्या काळात अनेक विकासकामे झाली.या कामाचे त्यांनी कौतुक केले.

नगराध्यक्षपदासाठी भाजपने डॉ. ज्योती महादेव बनसुडे यांच्यासारखा सक्षम, उच्च शिक्षित आणि सेवेतील सिद्ध पर्याय औसा शहराला दिल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, कोरोना काळात बनसोडे डॉक्टर दांपत्याने केलेली सेवा औसा विसरू शकत नाही. यापुढेही अशीच सेवा करण्यासाठी आता त्यांना संधी द्या. असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

# मुंबई महानगरपालिकेत आसिफ शेख यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १ डिसेंबर :** मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये सुरु असलेल्या विकासकामांना गती मिळावी यासाठी नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमध्ये लातूर तालुक्यातील मुशिराबाद येथील रहिवासी तथा वलांडीतील यासीन शहा यांचे भाचे आसिफ महेबूब शेख यांची कार्यकारी सहायक या प्रतिष्ठित पदावर निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्यांदाच वलांडी भेटीवर आलेल्या आसिफ शेख यांचे गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात, यासीन शहा यांच्या फ्रूट दुकानाजवळ अतिशय उत्साहात आणि भव्य स्वागत करण्यात आले.



या स्वागत सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील, दत्ता बिरादार, वैजनाथ मुंजाळ, रामलिंग बिरादार, मजरू बौडीवाले, बाबूलाल पठाण, नियाज शहा, मुबारक कादरी, मुस्ताक कादरी, शफिक सौदागर, मस्जिद कुरेशी, नयुम तांबोळी, मैनु मुर्शेद, मुदसिर सय्यद, धनराज बनसोडे तसेच गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

विशेष म्हणजे, साधारण गरीब परिस्थितीत मुशिराबाद या गावातच टेलरिंगचा व्यवसाय करणाऱ्या आई-वडिलांनी आपल्या मुलाला दिलेले शिक्षण आज खऱ्या अर्थाने सार्थक झाले, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकतेच्या बळावर मिळवलेले हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

स्थानिक जनप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी आसिफ शेख यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




# लाल बहादूर शास्त्री विद्यालयात संविधान दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १ डिसेंबर :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात ७६ वा भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा मारावार तर प्रमुख अतिथी राहूल नेटके तानाजी खोकले एकनाथ राऊत उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले अभ्यासपूरक मंडळ सहप्रमुख निलेश मांडवकर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना राहूल नेटके यांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपली स्वतःची राज्यघटना निर्माण करण्याची गरज, ती राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. तर तानाजी खोकले यांनी वेगवेगळ्या उदाहरणाच्या साह्याने भारतीय संविधानाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाध्यक्ष कृष्णा मारावार म्हणाले, की भारतीय संविधानाचा सर्व अंगानी आपण अभ्यास केला पाहिजे. संविधानामुळेच आपली लोकशाही आजपर्यंत टिकून आहे म्हणून संविधानाचे महत्त्व आपण सर्वांनी लक्षात घ्यावे असे मत व्यक्त केले.

संविधान दिनाच्या निमित्ताने आज लालबहादूर शास्त्री विद्यालयातील राष्ट्रीय कॅडेट कोर एनसीसी विभागाच्या वतीने शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीसाठी एनसीसी विभाग प्रमुख विष्णू तेलंग रॅली प्रमुख लक्ष्मी चव्हाण यांनी परिश्रम घेतले. तसेच विद्यार्थ्यांच्या साह्याने गुरुदत्त महामुनी यांनी भारताच्या नकाशाची प्रतिकृती तयार केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सृष्टी कोसंबे प्रास्ताविक .ऋतुजा सुरवसे तेजस्विनी रायपल्ले तर आभार अपेक्षा केंद्रे पूजा पाटील यांनी मानले. संविधान गीत तेजस्विनी स्वामी वैष्णवी डोईजोडे यांनी सादर केले. संविधानाचे वाचन गायत्री तोगरगे या विद्यार्थिनीनी केले. तर शरयू पांचाळ या विद्यार्थिनीच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. ज्ञानोपासक मंडळाच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानोपासक मंडळ प्रमुख आशा गौतम, कार्यक्रम प्रमुख संतोष गजलवार सह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भगवद्‌गीता जयंतीनिमित्त पंधरावा व बाराव्या अध्यायाचे सामूहिक पठण

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १ डिसेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात गीता जयंती निमित्त



बाराव्या व पंधराव्या अध्यायाचे पठण करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुने प्रमुख पाहुणे चिन्मय मिशन च्याअध्यक्षा मालतीताई कुलकर्णी, सचिव अर्चनाताई चिकटवार पोस्ते पोदार स्कूलचे सचिव सुरज पोस्ते, सतनप्पा हूरदळे, व्यंकटराव गुरमे, संतोषराव कुलकर्णी अंकुशराव मिरगुडे, शिवाजीराव बिराजदार, षण्मुखानंद मठपती, श्रीपाद सीमंतकर प्रकाश येरमे, वसंतराव कलकोटे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे, निलेश मांडवकर यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या बीड, लातूर, अंबाजोगाई, माजलगाव, पैठण आणि उदगीर येथील शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी मुखोद्गत गीतेच्या बारा व पंधराव्या अध्यायाचे पठण केले. या सहाही संकुलातील विद्यार्थी थेट प्रक्षेपणाद्वारे जोडले गेले. सकाळी आठ वाजता एकत्रितपणे पठण करण्यात आले. गीता जयंतीनिमित्त संतोष कुलकर्णी यांनी आपल्या वक्तव्यातून भगवद्गीतेतून आपल्याला त्याग, समर्पण, प्रेम, करूणा, दया या सर्व मूल्यांची ओळख होते .गीतेचे चिंतन करावे १२ व्या व १५व्या अध्यायाचे महत्त्व थोडक्यात सांगितले.

प्रास्ताविकेतून किरण नेमट यांनी भगवद्गीतेला जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनाचे सार म्हणजे गीता असे विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया गोविंदवाड यांनी केले स्वागत व परिचय पारसेवार अंबिका व आभार पर्यवेक्षक कृष्णा मारावार यांनी व्यक्त केले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पती, सासू-सासऱ्यांना कठोर शिक्षा

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १ डिसेंबर :** सासरच्यांकडून हुंड्यासाठी होणाऱ्या सततच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केलेल्या विवाहितेच्या पतीसह सासू - सासऱ्यांना उदगीरच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे.

उदगीर तालुक्यातील लोणी येथील मयत नीलम्मा स्वामी हिने हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला कंटाळून आपल्या सात महिन्याच्या मुलीसह स्वतःला रॉकेल ओतून जाळून घेतले होते. याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात मयत विवाहितेचा पती, सासू, सासरा दीर व नणंद यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुद्ध उदगीरच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयाने पती ब्रम्हानंद स्वामी याला दहा वर्षांची शिक्षा सुनावली. तर सासरा गुरुनाथ स्वामी व सासू शांताबाई स्वामी यांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात सरकारी वकील म्हणून एड. शिवकुमार गिरवलकर यांनी काम पाहिले . गिरवलकर यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्या. वाय .बी. गमे यांनी आरोपींना ही शिक्षा ठोठावली.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण १० साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. कठोर शिक्षा झालेल्या आरोपींवर कारावासाच्या शिक्षेशिवाय विविध कलमान्वये २७ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

# एड्स दिनानिमित्त किनगावमध्ये व्याख्यान व विविध स्पर्धा

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १ डिसेंबर :** अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयात १ डिसेंबर जागतिक एड्स दिन या दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, महात्मा फुले महाविद्यालय किनगाव संचलित रेड रिबन क्लब व आयसीटीसी ग्रामीण रुग्णालय अहमदपूरच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वा एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या जनजागरण रॅली ला हिरवा झेंडा महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ बबनराव बोडके आणि समुपदेशक गणेश स्वामी यांनी दाखविला.

यावेळी प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुर्यवंशी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भारत भदाडे आदी प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. ही रॅली महात्मा फुले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून निघून किनगांव च्या प्रमुख रस्त्याने जनजागृती करत महाविद्यालयात आली. या रॅलीत २८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता



त्यानंतर प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांच्या मार्गदशाखाली विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण होते तर प्रमुख मार्गदर्शक गणेश स्वामी, गणेश सुर्यवंशी आदि होते.

यावेळी व्याख्यान कार्यक्रमात समुपदेशक गणेश स्वामी, प्रयोग शाळा तंत्रज्ञ गणेश सुर्यवंशी यांनी मार्गदर्शक करताना विद्यार्थ्यांना एड्सबाबत जनजागृती, प्रतिबंधक उपाय करताना जीवनात तीन एबीसीचा अवलंब करावा अन्यथा मृत्यू अटळ असल्याचे सांगितले. त्याबरोबच रक्तदानाचे महत्त्व, आरोग्यदायी जीवनशैली याबाबत माहिती दिली आणि रेड रिबन क्लबमधील स्टार सदस्य तुकाराम पांचाळ, संगमेश्वर इरले, संदीप खलसे, किशोर रायभोळे, स्वप्निल मुळे अभिजीत कांबळे, प्रज्ञा मस्के, शितल बदने, महानंदा कराड, अंकिता भंडारे, साक्षी कांगणे, स्वाती तिगोटे, योगिता सूर्यवाड आदी विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला आणि उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण यांनी सखोल माहिती देत अध्यक्षीय समारोप केला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन कु शिवराम फड यांनी केले तर शेवटी आभार प्रा. बालाजी आचार्य यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित प्रा लक्ष्मण क्षिरसागर प्रा. दयानंद सुर्यवंशी, प्रा. बालाजी आचार्य, प्रा. राजू गुट्टे, डॉ. विरनाथ हुमनाबादे, डॉ. अनंत सोमवंशी, प्रा. संजय जगताप, डॉ. बळीराम पवार, डॉ प्रभाकर स्वामी , डॉ. सदाशिव वरवटे, प्रा. राजुकुमार शिंदे, प्रा. पांडूरंग कांबळे, डॉ चेतन मुंढे, प्रा. कृष्णा केंद्रे, डॉ. दर्शना कानवटे, डॉ. अंकिता जाधव, डॉ. पदमजा हगदळे, डॉ. मिरा शिदे, प्रा. चंद्रमणी बनसोडे, प्रा. सुनिल शिंदे, प्रा. अभय गोरटे, प्रा. विक्रम गायकवाड, डॉ. सुमेध जोगदंड, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. विठ्ठल कबीर, कार्यालयीन अधिक्षक गोपाळ इंद्राळे, उद्धवराव जाधव, इद्रदेव पवार, अनिल भदाडे, कृष्णा धरणे, शिवाजी हुबांड आदिची होती राष्ट्रगीताने व्याख्यानाची सांगता झाली मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### सक्षम ताटे खून प्रकरण

# आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

सक्षम ताटे खुन प्रकरणातील आरोपीच्या पोलीस कोठडित तीन दिवसाची वाढ करण्यात आली आहे. महिला आरोपी तसेच अल्पवयीन आरोपीला वगळून न्यायालयाने अन्य चार जणांच्या पोलीस कोठडीत वाढ केली आहे.

दि. २७ नाव्हेंबर रोजी प्रेम प्रकरणातून सक्षम ताटे याचा गोळ्या झाडून व डोक्यात फरशी घालून खुन करण्यात आला होता. पोलीसांनी या प्रकरणात जयश्री मदनसिंह ठाकुर उर्फ मामीडवार, गजानन बालाजी मामीडवार, सुभाष लखे व वेदांत अशोक कुदळेकर यांना अटक केली होती. न्यायालयाने यापुर्वी त्यांना एकदिवसाठी पोलीस कोठडी सुनावली होती. आज वाढीव पोलीस कोठडी मागणीवर दुसरे अतिरिक्त सत्र न्यायाधिश एस.डी. तावशिकर यांनी महिला आरोपीस वगळुन इतर चार जणांच्या पोलीस कोठडीत वाढ केली आहे.

दरम्यान ही हत्या प्रेमप्रकरणातून झाली असून राज्यभर चर्चा होत आहे. आज या प्रकरणात पिडीत कुटूंबाची ॲड. गुणरत्न सदावर्ते व त्यांच्या पत्नीने भेट घेवून ताटे कुटूंबीयाचे सांत्वन केले. हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याबरोबरच खटला देखिल लढण्याची तयारी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी दर्शवली.

# रब्बी हंगामासाठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिक स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिक स्पर्धा रब्बी हंगाम २०२५ साठी आयोजित करण्यात आल्या आहेत. रब्बी हंगाम सन २०२५ पिकस्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांना केले आहे.

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्याकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते, अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन विजेत्या शेतकऱ्यांचा गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढण्यास मदत होऊन अधिक उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल हा उद्देश ठेवून राज्यात कृषि विभागामार्फत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

**पिक स्पर्धेतील पिके**

रब्बी पिकात ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांचा समावेश आहे.

**पात्रता निकष**

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व जमीन तो स्वतः कसत असणे आवशक्य आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येल. पीकस्पर्धामध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

**कागदपत्रे**

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ). ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन. सातबारा, ८-अ उतारा. जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास. पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबधित सातबारा वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा. बँक खाते चेक, पासबुक पहिल्या पानाची छायांकित प्रत.

**अर्ज करण्याची मुदत**

खरीप हंगामामध्ये पिकस्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख पुढील प्रमाणे राहील. ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस . ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पिकासाठी ३१ डिसेंबर २०२५ राहील. अर्ज दाखल करण्याच्या तारखेच्या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास त्यापुढील शासकीय सुट्टी नसलेली तारीख गृहीत धरण्यात यावी.

**स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क**

पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम तिनशे रुपये राहील व आदिवासी गटासाठी रक्कम एकशे पन्नास रुपये राहील. सहभागी शेतकऱ्यांनी प्रवेश शुल्क स्वतः ०४०१ पिक संवर्धन १०४ शेती क्षेत्रापासून प्राप्त जमा रक्कमा (००) (०२) पीक स्पर्धा योजनेखालील जमा रक्कमा ०४०१०४७३०१ या शिर्षामध्ये शासकीय कोषागारात विहीत मुदतीत जमा करावे.

**बक्षिसाचे स्वरूप**

पहिले, दुसरे, तिसरे यानुसार तालुका पातळीवर ५ हजार, ३ हजार, २ हजार त्याप्रमाणे जिल्हा पातळीवर १० हजार, ७ हजार, ५ हजार तर राज्य पातळीवर ५० हजार, ४० हजार, ३० हजार रुपये बक्षिस सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस स्वरुपात दिले जाईल.

या योजनेबाबत अधिक माहितीसाठी राज्य शासनाच्या कृषि विभागाचे ु.ज्ञीळीहळ.ारहरीरीहीीर.सीं.ळप या संकेतस्थळावर किंवा संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन कृषि कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# निवडणुकीत 'बायोमेट्रिक व्होटिंग' प्रणाली लागू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

लोकशाही प्रक्रिया अधिक मजबूत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने, नांदेड येथील एका प्रमुख नागरिकाने निवडणुकीत आधार कार्ड आणि अन्य सरकारी डेटाबेसशी संलग्न असलेल्या बायोमेट्रिक सत्यापन प्रणाली (Biometric Verification Systeा) अनिवार्य करण्याची मागणी केली आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले (भा.प्र.से.) यांनी हे निवेदन पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी (उएज) यांच्याकडे सादर केले आहे.

स. रंजीत सिंघ अमरजीत सिंघ गिल, सदस्य, शिख समुदाय समन्वय समिती, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्य निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग यांना उद्देशून हे निवेदन दिले होते. या निवेदनामध्ये, देशभर मतदानाच्या वेळी आधार कार्ड, राशन कार्ड किंवा अन्य सरकारी डेटाबेसशी जोडलेल्या बायोमेट्रिक सत्यापन प्रणालीला अनिवार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे बोगस मतदानाला आळा बसेल आणि लोकशाहीचा पाया अधिक मजबूत होईल, असे मत निवेदनात व्यक्त करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी संदर्भ निवेदनाची प्रत प्रधान सचिव तथा, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्राद्वारे पाठवली आहे.

सदर मागणीच्या अंमलबजावणीसाठी योग्य विचार आणि कार्यवाही करावी, अशी विनंती या शासकीय पत्रात करण्यात आली आहे. या मागणीमुळे भविष्यात मतदान प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## श्री दत्त जयंती निमित्त सव्वाखंडी तांदुळाची महापूजा

**सोनखेड** -मडकी येथे श्री दत्त जयंती निमित्त मडकी येथे कलश स्थापना दि २९-११-२०२५ रोजी होणार असून त्या निमित्त अखंड दत्तनाम सप्ताह व सव्वा खंडी तांदूळाची महापुजेचे आयोजन करण्यात आले असून व दि ५-१२-२०२५ रोजी श्री रुद्रगिरी महाराज किवळेकर यांचे कीर्तन व साय गावातील मुख्य रस्त्याने पालखी मिरवणूक व महाप्रसाद साय ६ वाजता महापुजेस प्रारंभ होणार असून या महापुजेस संत खुशालगिरी महाराज मठ संस्थान शंखतीर्थ व संत निर्गुणपुरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असणार असून या कार्क्रमास सर्व भाविक भक्त व परिसरातील सर्व नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त मडकी येथील गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले.

## श्री गुरु चरीत्र पारायण व दत्त नाम सप्ताह प्रारंभ

**इस्लापूर** -किनवट तालुक्यातील इस्लापूर रेल्वे स्टेशन येथील श्री दत्त मंदिर येथे गावकर्यांच्या वतीने २७ नोव्हेंबरपासून ते दिनांक ४-१२-२०२५ पर्यंत श्री गुरु चरीत्र पारायण व दत्त नाम सप्ताह व शिवमहापुराण कथेला सुरुवात झाली आहे. कथेचे शिव कथाकार श्री भीमाशंकर महाराज यांच्या अमृतवाणीतून ऐकवयास मिळत आहे. सप्ताहातील



दैनदिन कार्यक्रमाची रूपरेषा: सकाळी ७ ते १० श्री गुरुचरित्र पारायण ११ ते १ श्री दत्त नाम स्मरण (पारा) दुपारी १ ते ५ शिव महापुराण सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ रात्री ८ ते १० भजन जागर या प्रमाणे राहणार आहे.व दिनांक ४-१२-२०२५ रोज गुरुवार दत्त पौर्णीमा निमित्य सकाळी होम हवन श्री दत्त महाराजांची मूती स्थापना व कलशारोहण होइल नंतर लगेच ह.भ.प.माऊली महाराज पुंगळकर धामणगाव (सेलु) यांचे काल्याचे किर्तन होईल परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन दत्त मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## बहुजन संघर्ष सेनेच्या २४ व्या वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**नांदेड**-बहुजन संघर्ष सेनेच्या २४ व्या वर्धापन दिना च्या निमित्ताने संघटनेच्या कार्यलयात संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांनी सर्व कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणात संघटनेचा लेखा जोखा मांडल्या गेल्या २४ वर्षा पासून संघटना कशा पद्धतीने समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाऱ्याचं विरोध लढत आलेली आहे. तसेच संघटनेने वेळो वेळी उभारलेल्या आंदोलन हे कशा पद्धतीने यशस्वी झाले आहेत. राजकीय दृष्ट्या वेळो वेळी संघटनेने घेतलेली भूमिका हि त्यांनी मंडली आणि येणाऱ्या काळात संघटना हि आजून जोमाने काम करेल अशी गव्यही सुखदेव चिखलीकर यांची दिली .तसेच वर्धापन दिनाच्या निमित्ताने भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर याच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले .या वेळेस बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले ) चे मराठवाडा उपथ्यक्ष मा सुखदेव चिखलीकर, सुधाकर पांढरे मित्र मंडळाचे राहुल वाघमारे, राजेश चौदंते ,जयपाल चिखलीकर, अविनाश जोंधळे,मिलिंद जोंधळे,राहुल थोरात ,यश बहादुरे, नितीन देडे,किरण चित्ते,, शुभम जोंधळे,संतोष दुंडे,विशाल गायकवाड, रवी वाघमारे, वैभव चिखलीकर, लक्ष्मण ताटीपामुलवार, लक्ष्मी चिखलीकर, व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडणूक मतदार संघात मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी

**नांदेड** -राज्य शासनाने राज्यातील नगर परिषदा व नगर पंचायतीच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मतदानाचा दिवस, मंगळवार, दि. २ डिसेंबर, २०२५ रोजी नांदेड जिल्ह्यातील नगर परिषद/नगर पंचायत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघात अधिसूनेद्वारे सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांना देखील लागू राहील. तसेच नांदेड जिल्ह्यातील नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील केंद्र शासनाची शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका इत्यादींना लागू राहणार असल्याचे अधिसूचनेत नमूद केले आहे.

## धनेगाव येथे महिलांची आरोग्य तपासणी

**नांदेड** -बचत गटातील महिलांनी आर्थिक सक्षमीकरणा बरोबर स्वतःचे आरोग्याबाबत सक्षम असावे या करता माविम सावित्री लोकसंचालित साधन केंद्र नांदेड व प्राथमिक आरोग्य केंद्र नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने धनेगाव येथे बचत गटाच्या माध्यमातून १०३ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हा आरोग्य तपासणी कार्यक्रम मुख्य समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अमितकुमार रोडे यांच्या प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन खाली पार पडला.

# धोबी समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा अधिवेशनात मांडणार : आ. कल्याणकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

धोबी समाजाला १९६० पूर्वी असलेले एससी आरक्षणाबाबत हिवाळी अधिवेशनात मांडण्यात येणार असे आश्वासन नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी नॅशनल धोबी महासंघाच्या शिष्टमंडळास दिले.



धोबी समाजाला १९६० पूर्वी एससीमध्ये आरक्षण होते. १९६० नंतर ओबीसी प्रवर्गात टाकण्यात आले. धोबी समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. अनेकदा आंदोलने, मोर्चे काढल्यावर राज्य सरकारने २००१ साली समिती स्थापन केली. डॉ. दशरथ भांडे समितीची नेमणूक करण्यात आली व त्या समितीने पूर्ण महाराष्ट्रातील समाजाच्या घरोघरी जाऊन तपास केला असता त्यांच्या तपासणी अंती असे निष्पन्न झाले की, धोबी समाज हा अस्पृश्यतेचे निकष पूर्ण करतो. त्यामुळे या समाजाला तात्काळ अनुसूचित जाती प्रवर्गाच्या तत्सम सवलती लागू करण्यात याव्यात, परंतु २५ वर्षे झाले तरी राजय सरकार धोबी समाजासोबत चालढकल करीत असल्यामुळे येत्या ८ डिसेंबर २०२५ पासून नागपूर हिवाळी अधिवेशनात नॅशनल धोबी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष संतोष औंढेकर हे यशवंत स्टेडियम, नागपूर येथे आमरण उपोषण करणार आहेत. तसेच धोबी समाजाचे असंख्य कार्यकर्ते साखळी उपोषण करणार आहेत. यासाठी आ. कल्याणकर यांची भेट घेतली असता त्यांनी वरील आश्वासन दिले.

यावेळी नॅशनल धोबी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष संतोष औंढेकर, प्रदेश उपाध्यक्ष वामनराव पेनूरकर, प्रदेश सहसचिव किशनराव राकुरे, मराठवाडा उपाध्यक्ष कोंडिबा मांजरमकर, मराठवाडा संघटक गोविंदराव कुंटूरकर, जिल्हाध्यक्ष बालाजी कापसे, कार्याध्यक्ष मार्तंड भंडारे, उपाध्यक्ष पंढरी येवले, महानगराध्यक्ष पिंटूभाऊ मारवाडीकर, महानगर सचिव प्रभाकर वाळकीकर, सल्लागार अशोक मुत्तेपवार, संघटक शिवाजी काकांडीकर, रावण हाळदेकर, बालाजी भंडारे, नागनाथ इबितदार, दत्ता तेलंगे, समाधान कांबळे, गुणाजी गोरठेकर आदींची उपस्थिती होती.

## गजानन कोटगीरे यांचे निधन



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १ डिसेंबर-**

बाऱ्हाळी ता. मुखेड येथील रहिवासी गजानन सुभाषराव कोटगीरे ( वय ४२ ) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी ( दि. १) पहाटे ३:३० वा. दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी १२:३० वाजता मौजे बाऱ्हाळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, एक बहीण, एक मुलगा असा परिवार आहे. बाऱ्हाळी येथील व्यापारी तथा जेष्ठ पत्रकार साईनाथ कोटगीरे यांचे ते बंधू होत.

# वाढते हृदय रुग्णांचे प्रमाण ही धोक्याची घंटा : डॉ.अशोक कौरवार

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १ डिसेंबर-**

बहुतांश नागरिकांचे खाणीमान व राहणीमान बदलल्याने च मुखेड तालुक्यांसारख्या डोंगराळ भागातील मेहनती नागरिकांनाही हृदयविकारांचे आजार उद्भवत आहेत. छातीमध्ये दुखत असताना अनेक रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक तज्ञ डॉक्टरांकडे न जाता ग्रामीण भागात घरगुती उपाय करताना दिसून येत आहेत यामुळे त्यांच्या जीवनात धोका होत आहे . सामान्य लोकांनी हृदय रोगाची लक्षणे वेळीच ओळखणे,नातेवाईकांनी अशा व्यक्तीला त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल करणे गरजेचे आहे. CPR म्हणजे जीवन संजीवनी ह्या आपत्कालीन प्रथमोपचार ची माहिती सर्व जनतेस विशेषतः तरुण वर्गास असणे आवश्यक झाले आहे. असेही आवाहन मुखेड शहरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अशोक कौरवार यांनी नागरिकांना केले .त्यांनी त्यांच्या रुग्णालयात एकाच दिवशी चार हृदयरोगी रुग्णांना जीवदान दिले आहे यावेळी ते बोलत होते.

मुखेड तालुका डोंगराळ भागाने वेढलेले असल्यामुळे या भागातील बहुतांश ग्रामीण भागातील नागरिक मेहनती व कष्टाळू निरोगी म्हणून ओळखला जातो मात्र आता ही ओळख पुसल्या जात असून शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकांचे आणि मान व राहणीमान यामुळे मोठ्या प्रमाणावर हृदयविकाराचा धोका वाढला असल्याचे सध्या पहावयास मिळत आहे. मुखेड शहरातील रुग्णालयात दररोज हृदयविकारांचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत आहेत .शहरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ, मुखेड चे हृदयराज,डॉक्टर अशोक कोरवार यांच्या रुग्णालयात एकाच दिवशी तब्बल चार रुग्ण हृदयविकाराच्या गंभीर आजाराने मृत्यूच्या दारात उभे असताना उपचारासाठी त्यांना दाखल करण्यात आले यावेळी चारही रुग्णावर योग्य उपचार डॉ. अशोक कौरवार यांनी केला व त्यांना पुढील अंजॉग्रफी साठी नांदेडला पाठविण्यात आले. योग्य वेळी योग्य उपचार मिळाल्याने या रुग्णांना जीवदान मिळाले. मात्र ग्रामीण भागात रुग्णाच्या छातीत दुखत असताना तो रुग्ण गावातीलच एखाद्या सलाईन इंजेक्शन देण्याची थोडी माहिती असलेल्या अशिक्षित व्यक्तीकडे जाऊन उपचार घेत आहेत यातून त्यांची प्रकृती गंभीर होत चालली असून शेवटच्या क्षणी ते मुखेड शहरातील रुग्णालय गाठत आहेत . डॉक्टर अशोक कौरवार यांनी सांगितले की नागरिकांनी योग्य आहार व दररोज शारीरिक व्यायाम केल्यास हृदयविकाराच्या धोका टाळता . पोटाच्या वरच्या भागात तुम्हाला सतत त्रास होत असल्यास किंवा अचानक दुखणे वाढले असल्यास तात्काळ तुम्ही तज्ञ डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्यावा कदाचित तो हृदयरोगाचा धक्का सुद्धा येण्या अगोदर संकेत असू शकतात. यासाठी नागरिकांनी सतर्क राहून वेळेत उपचार करून घ्यावेत तसेच नियमित आपली शारीरिक तपासणी करून घ्यावीत. आहारामध्ये सर्वात उत्तम आहार म्हणजे शाखा आहार, असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला. यावेळी हरी पाटील , शहाजी राकुरे व संजय रिंदकवाले हे प्रशिक्षित कर्मचारी उपस्थित होते

# एड्स दिनानिमित्त प्रभावी उपक्रम



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १ डिसेंबर-**

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधत समाजातील अंधश्रद्धा, गैरसमज आणि एड्सग्रस्तांविषयीचा भेदभाव दूर करण्याचा स्तुत्य उपक्रम नरसी येथील कै.गोपीनाथ राठोड नर्सिंग कॉलेज तर्फे राबविण्यात आला.

श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेत भव्य प्रांगणात उपस्थित विद्यार्थ्यांसमोर प्रभावी पथनाट्य सादर करून जन जागृतीचा ठसा उमटविला.

कॉलेजचे प्राचार्य अशोक राठोड यांच्या नेतृत्वाखाली सह शिक्षिका कुमारी मेघा सूर्यवंशी, शिक्षक आदित्य मधूकर राठोड, वैभव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

नर्सिंग विद्यार्थ्यांमध्ये विक्रम आडे, मुजफ्फर शेख, रूपेश राठोड, प्रिया पांचाळ, कविता नारलानाड, ऐश्वर्या राठोड, अरुणा ढेपाळ, आरती चव्हाण, दिपिका चव्हाण, श्रावणी पांचाळ, मयुरी पवार, दिपाली पवार, क्रांती शिंगणे, प्रियांका हानवटे, नागेश वगवाड, पांडुरंग सुरेवाड, बाबुराव देवदे, शुभम गायकवाड, शैलेश घंटेवाड, शिवराज, आरती चव्हाण, दिपाली पवार आदी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या पथनाट्यातून एड्स ग्रस्त व्यक्तींवरील भेदभाव अयोग्य असून त्यांना समाजात समान स्थान देणे गरजेचे आहे, असा संवेदनशील संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला. तसेच एड्सची प्रतिबंधक काळजी, योग्य माहिती आणि सुरक्षित वर्तनाबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. यावेळी विद्यार्थीनी भरभरुन दाद दिली तर प्रेक्षकांनी या उपक्रमाचे भर भरून कौतुक केले.

कार्यक्रमाला माध्यमिक आश्रम शाळेचे प्राचार्य विजयकुमार देशमुख, सहशिक्षक सूर्यकांत जाधव, आनंदराव सूर्यवंशी, नागनाथ येलूरे, संभाजी मेहेत्रे, व्यंकट रेकूळवाड, सुरेश पवार, सुभाष राठोड महेंद्र सारवले,शिवराम राठोड,सुभाष कदम, एकनाथ मुनगीलवार,फेरोज शेख दिपक बि-हाडे,तसेच पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक पांडुरंग येवले, उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेजचे प्रा.गणेश मारताळेकर,प्रदीप लापशेटवार, शिव शंकर कोरे, दिलीप माने,गजानन श्रीरामे सह, चतूर्थ कर्मचारी हाणमंत सिंगवाड, बालाजी राठोड सह,अनेक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या पथनाट्य कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शंकर राठोड यांनी केले

अशा प्रकारचे उपक्रम समाजातील गैरसमज दूर करून आरोग्य जागरूकतेची बीजं पेरतात, असा सार्वत्रिक निष्कर्ष उपस्थितांनी व्यक्त केला.

# स्क्रॅप मिळवुन देण्याच्या नावायाली कोट्यावधीची फसवणुक करणाऱ्या अरोपीचा जामीन नाकारला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

सिप्टा कंपनीच्या मशिनरी स्क्रॅप मिळवून देण्याच्या नावाखाली तब्बल १ कोटी १५ लाखांची फसवणूक केल्याचा एक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी राजवीर सिंह मल्होत्रा (रा. पुणे) याला अटक करून न्यायालयात हजर केले असून, न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळत त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान राजवीरसिंह मल्होत्रा याने जामीनासाठी अर्ज केला होता परंतू न्यायलयाने अर्ज फेटाळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड शहरातील चैत्यनगर येथील रहिवासी मोहम्मद ताहिर अली आणि त्यांचे सहकारी ख्वाजा मोईनुद्दीन यांच्याशी सिप्टा कंपनीच्या ५ हजार टन मशिनरी स्क्रॅप संदर्भात आरोपी राजवीर मल्होत्रा याने संपर्क साधला होता. या व्यवहाराबाबत १२ ऑगस्ट २०२४ रोजी साक्षीदारांच्या उपस्थितीत करार करण्यात आला. करारानुसार आरोपीने संबंधित स्क्रॅप तक्रारदारांना पुरवून देण्याचे आश्वासन दिले.



कराराप्रमाणे तक्रारदारांनी आरोपीसाठी १० लाख रोख, ५० लाख आरटीजीएस बँक ट्रान्सफर, ५ लाख शुऐब खानमार्फत ट्रान्सफर असे एकूण ६५ लाख रुपये अदा केले. त्यानंतर आरोपीवर विश्वास ठेवून तक्रारदारांनी आणखी ५० लाख दिले, अशा प्रकारे एकूण छ१ कोटी १५ लाख रुपये देण्यात आले.

मात्र एवढी मोठी रक्कम मिळूनही आरोपी स्क्रॅप देण्याबाबत सतत टाळाटाळ करत राहिला. तक्रारदारांनी कंपनीशी थेट संपर्क साधताच आरोपीने कंपनीकडे कोणतीही रक्कम जमा केली नसल्याचा धक्कादायक खुलासा झाला. पैसे मागणीवर आरोपीने ३० लाख आणि ३५ लाखांचे दोन धनादेश दिले, मात्र दोन्ही चेक बाऊन्स झाले.

यानंतर तक्रारदार मोहम्मद ताहिर अली यांनी १५ नोव्हेंबर २०२५ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक ओमकांत चंचोलकर यांनी विशेष पथकाची स्थापना केली. पथकाने पुण्यात सापळा रचून राजवीर मल्होत्रा याला अटक केली.

आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. कोठडी संपल्यानंतर आरोपीने जामीनासाठी अर्ज दाखल केला, मात्र सरकारी बाजूने तीव्र विरोध दर्शवल्यानंतर न्यायालयाने जामीन नाकारत आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठविले.

या प्रकरणात तक्रारदारांच्या वतीने सहायक सरकारी वकील म्हणून ॲड. हबीब काझी यांनी यशस्वीपणे बाजू मांडली, ज्यामुळे आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. या फसवणूक प्रकरणामुळे व्यापारी वर्गामध्ये मोठी खळबळ उडाली असून पुढील तपास नांदेड ग्रामीण पोलीस करत आहेत.